श्रीदासराम ग्रंथमाला : पुष्प २४

**श्रीदासराममहाराज विरचित**

**ग्रंथत्रयी**

**(आत्मबोधप्रत्ययामृत- श्रीदासराम विंशिका- श्रीदासराम पंचविशी)**

**(विवरण)**

GRANTHATRAYI

**प्रकाशक** : श्री. नारायण देशपांडे
(अरविंद माणगांवकर)
अंकलीकर भवन बी/३
गांवभाग पोलीस चौकीजवळ, श्रीरामलॉजसमोर
गांवभाग,सांगली.४१६ ४१६
फोन - ०२३३- २३३३३९०

**प्रथम आवृत्ति** : इ.स. २०११

**प्रकाशन दिन** : माघ शु. दशमी शके १९३२
(श्रीनारायणमहाराज यरगट्टीकर पुण्यतिथी)
(श्रीदासराममहाराज केळकर कीर्तन वाढदिवस)
रविवार दिनांक १३/०२/२०११

© सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन

**मुद्रक** : श्री. अनिल लोखंडे
श्रीदासराम ऑफसेट, सांगली.
दूरध्वनी-(०२३३) २३२२७२९

**प्रसाद मूल्य** : रु. ७०/-

श्रीदासराम ग्रंथमाला : पुष्प २४

श्रीदासराममहाराज विरचित

# ग्रंथत्रयी

**(आत्मबोधप्रत्ययामृत- श्रीदासराम विंशिका- श्रीदासराम पंचविशी)**

## (विवरण)

ॐ

◆ लेखक व प्रकाशक ◆

**श्री नारायण देशपांडे**
उर्फ
**श्री अरविंद माणगांवकर**

आवृत्ति पहिली सांगली इ.स. २०११

# - अनुक्रम -


मनोगत ........................................... एक

धन्यवाद ............................................... चार

आशिर्वाद ............................................... पाच

प्रार्थना ............................................... सात

आत्मबोधप्रत्यामृत ...............................................१

श्रीदासरामविंशिका ...............................................३३

श्रीदासरामपंचविंशि ...............................................६७

श्रीदासराममहाराजांची आरती.......................................९७

आरती...........................................................९८

## मनोगत

।। राजाधिराज श्रीसद्गुरुनाथमहाराज की जय ।।

महाराष्ट्राची संतपरंपरा मोठी आहे. अशा संतपरंपरेमध्ये उपजतच पारमार्थिक अधिकार प्राप्त झालेल्या सत्पुरुषांमध्ये सद्गुरु श्रीदासराममहाराजांचा अंतर्भाव होतो. श्रीदासराममहाराजांनी ३९ वर्षे प्रतिदीनी अखंड हरिकीर्तन करुन आपले पितृदेव श्रीमामामहाराजांच्या अखंड हरिकीर्तनाची परंपरा पुढे चालविली. या कीर्तन, प्रवचनाबरोबरच त्यानी विपूल प्रमाणात गद्य-पद्यात्मक स्वरुपात पारमार्थिक लेखन केले आहे. अद्यापही त्यांचे कांही अप्रकाशित लेखन प्रकाशित करण्याचे काम चालू आहे.

श्रीदासराममहाराजांचे वाड.मय म्हणजे अनादि संत परंपरेचे दिव्य दर्शनच होय. वेद उपनिषदामधील ज्ञानाबरोबरच संतपरंपरा आणि सद्गुरुविषयीचे भक्तीप्रेम यांचा मनोहारी विलास श्रीदासराममहाराजांच्या वाड.मयात दिसून येतो. श्रीदासराममहाराजांच्या लेखनामधील कांही भाग गूढार्थ दर्शविणारे आहेत.त्यांच्या विविध प्रकारच्या लेखनापैकी श्रीदासराम विंशिका, श्रीदासराम-पंचविशी आणि आत्मबोधप्रत्ययामृत अशी तीन लघुकाव्ये विविरणासाठी घेतलेली आहेत. त्यानी लेखन केलेल्या ओव्यामधील संकल्पनेवर अधिक प्रकाश टाकून विविरण केलेले आपणा सर्व परमार्थप्रेमी जनांना आवडेल असे मला वाटते. हे विविरण, स्पष्टीकरण म्हणजे त्यांच्या विचारांचा विविध अंगांनी केलेल्या चिंतनाचा प्रयत्न आहे. असे चिंतन म्हणजे आध्यात्मिक सिद्धांताचे सारग्रहण करणे होय. हे विवरण करताना 'श्रीदासराममहाराजांचा वचन संग्रह' या पुस्तकाचा संदर्भाकरिता उपयोग केला आहे. श्रीदासराममहाराज हे अद्वैती आहेत. त्यामुळे त्यांच्या लेखनाचा अद्वैत तत्त्वज्ञानाच्या अंगाने उहापोह करण्याचा प्रयत्न केला आहे. मूळ काव्यातील न लागलेल्या शब्दाबद्दल --- अशा रेषा ठेवलेल्या आहेत. हे विवेचन करण्याच्या निमित्ताने श्रीदासराममहाराजांच्या साहित्यातील कांही अमृतबिंदू घेता आले निश्चितच



आनंद आहे.

**१) श्रीदासराम विंशिका** :- हा लघुग्रंथ म्हणजे श्रीदासराममहाराजांनी रचलेल्या वीस ओव्यांचा समूह आहे. यामध्ये प्रामुख्याने ब्रह्माचे स्वरुप, विश्वाचे स्वरुप आणि जीवाचे स्वरुप यांचे वर्णन आलेले आहे. ब्रह्मामधील चंचळगुणामुळे दृश्य निर्माण झाले आहे. या दृश्यामध्ये आसक्त होऊन जीव बद्ध झाला आहे. दृश्याकडे वेगळेपणाने पहाणारा 'मी' निर्माण होऊन तो द्वैताच्या बंधनात पुरेपूर आडकला आहे. केवळ सद्गुरु कृपेमुळे, त्यांनी सांगितलेल्या साधनेच्या अभ्यासाने या दृश्याचा निरास होतो. दृश्याचा निरास होताच द्वैताचे बंधनातून जीव मुक्त होतो आणि तो निजत्वाशी म्हणजेच आत्मतत्त्वाशी अभेदरुपाने कसा एकरुप होतो याचे वर्णन येथे आलेले आहे.

**२) श्रीदासराम- पंचविशी** :- हा लघुग्रंथ म्हणजे श्रीदासराममहाराजरचित पंचवीस ओव्यांचा समुदाय आहे. या ओव्यांमध्ये पंचतत्त्वानी बनलेल्या मानवी शरीरामध्ये असलेल्या चैतन्याचा साक्षात्कार होण्यासाठी कोणते साधन सद्गुरु सांगतात याचे वर्णन आहे. श्रीगुरुलिंगजंगममहाराजांच्या कृपेमुळे हरिनाम हाताला येते. हरिनाम हाताला आले तरच अलक्ष्याचा ठाव लागतो. दृश्य, द्रष्टा आणि दर्शन ही त्रिपुटी संपते, जीवशिवाची ऐक्यता घडते आणि परिपूर्ण अशा समाधानाची प्राप्ति होते. वरील सर्व विषयांची मांडणी या लघुकाव्यामध्ये अत्यंत मोजक्या शब्दात आणि सूत्रमय भाषेमध्ये केलेली आहे.

**३) आत्मबोधप्रत्ययामृत** :- हा पासष्ट ओव्यांचा संग्रह आहे. ह्या ओव्यांच्या शीर्षकामध्ये सूचित केल्याप्रमाणे येथे आत्मसाक्षात्कार व त्यासाठीचे साधन यांचे संक्षिप्त वर्णन आलेले आहे. या लघुग्रंथामध्ये अद्वैतपर असे ब्रह्म, जीव आणि जगत् यासंबधीचे विवेचन आले आहे. मोक्षसाधन, सगुण-निर्गुण यांची ऐक्यता, साक्षात्काराचे परिणाम इत्यादी विषय आले आहेत. संत-सद्गुरुंचे स्मरण आणि त्यांचा कृपाशिर्वाद कायम रहावा म्हणून त्यांची केलेली प्रार्थना यांचा समावेश आहे. या ओव्यांच्यामधील

तात्त्विक विचारांची मांडणी सोईची होण्यासाठी ह्या पासष्ट ओव्या विषयानुक्रमाने एकत्रित करुन त्यांचे विवरण केलेले आहे. श्रीमत् श्रीशंकराचार्यांच्या अद्वैत सिद्धांताच्या अनुषंगाने ह्या ओव्यांच्या अर्थाचा मागोवा घेण्याचा प्रयत्न केला आहे.

श्रीदासराममहाराजांच्या वरील ग्रंथत्रयींचे, प्रकाशन करण्याचा योग केवळ त्यांच्याच प्रेरणेने प्राप्त झाला आहे. प.पू.दादा (श्रीदासराममहाराज) हे उपजतच योगी, ज्ञानी आणि भक्त होते. परंतु त्यांची नेमकी ओळख म्हणजे ते "प्रेमस्वरुप" होते. श्रीदादांनी सर्वावर प्रेम आणि प्रेमच केले. त्या प्रेमामध्ये निरपेक्षपणा होता, आईच्या प्रेमामधील कळवळा होता. सर्वानी अध्यात्मप्रवण व्हावे आणि आपल्या जीवनाचे उन्नयन करून घ्यावे या एकाच कार्यासाठी त्यांचा अवतार होता. कोणतेही गुणदोष न पाहता त्यांनी सर्वांना आपलसं केल यामध्येच त्यांची थोरवी दिसून येते. सद्गुरु श्री दादांच्या कृपाशिर्वादामुळेच ही अल्पशी वाड.मय सेवा घडू शकली. त्यांचे चरणी उगेयाचि माथा ठेवणे–इतकेच शक्य आहे.

श्रीदासराममहाराजांच्या वरील तीन लघुग्रंथामधील ओव्यांचे विवरण म्हणजे त्यांची 'शब्दपुजा' असून प. पू. आण्णांचे वात्सल्यपूर्ण आशिर्वाद, श्रीदादांच्या अंतरंगातील प्रा.डॉ. केशवकाका आपटे यांचे मार्गदर्शन आणि श्री. दिपक केळकर यांचे प्रेमळ सहकार्य या सर्वामुळेच हा सुयोग येत आहे. माझे बंधु श्री मनोहर माणगांवकर, माझे स्नेही श्री अनिलप्रभू केळकर आणि श्री रमेश लाळे या सर्वानी वेळोवेळी केलेल्या सहकार्याबद्दल त्यांचे आभार मानतो. श्री बाळासाहेब लोखंडे यांनी मुद्रणाचे काम अल्पशा अवधीत चोखपणे केले याबद्दल त्यांचे आभार. अखेर श्रीदासराममहाराजांची ही शब्दसुमनाने केलेली भावपुजा त्यांच्याच चरणी समर्पित करीत आहे.

।। राजधिराज श्रीसद्गुरुनाथमहाराज की जय ।।

दिनांक — नारायण देशपांडे
सांगली



## धन्यवाद

श्रीदादा हे श्रीदासराममहाराजांचे घरगुती नाव. दासराम ही मुद्रिका आपल्या लेखनात श्री रामराय गोविंद केळकर यांनी वापरलेली आहे. शंकर महाराज मिरीकर यांनी म्हटल्याप्रमाणे श्रीदादा हे पूर्वजन्मीचे योगिराज होते. त्यांनी चालू जन्मी इंदिरा व गोविंद हे महनीय माता व पिता निवडले. त्यांच्या पूर्व पुण्याईने त्यांना वयाच्या चौदाव्या दिवशीच सांगलीच्या ह. पां. ऊर्फ तात्यासाहेब महाराज कोटणीसमहाराजांचा दृष्टिद्वारा अनुग्रह लाभला आणि त्यांच्याच कृपेने श्रीदादांचे पुढील सर्व जीवन व्यतीत झाले.

श्रीदादांना वयाच्या आठव्या वर्षीच 'आत्मयाची काव्यस्फूर्ति' झाली आणि त्यांच्या पारमार्थिक लेखनाचा प्रारंभ झाला. लेखनासाठी त्यांनी गद्य व पद्य अशी दोन माध्यमे वापरली. तरी गद्यातील लेखनापेक्षा त्यांचे पद्यातील लेखन अधिक आहे. पद्यात त्यानी पदे, अभंग, श्लोक आणि ओवी हे छंद वापरले. त्यांच्या अभंग/ पदांचा 'श्रीदासरामगाथा' प्रकाशित झालेला आहे. त्यांचे काही ओवी छंदातील ग्रंथही "परमार्थसार आणि अन्य ग्रंथ" या पुस्तकात प्रसिद्ध झाले आहेत. त्यामध्ये 'श्रीदासराम-विंशिका', 'श्रीदासराम-पंचविशी' आणि 'आत्मबोधप्रत्ययामृत' हे तीन ओवीबद्ध प्रकरण ग्रंथ आहेत. ब्रह्म/आत्मा हे अंतिम सत्य तत्त्व आहे, पाच महाभूतांनी बनलेल्या शरीरातच आत्मचैतन्याचा साक्षात्कार नामस्मरणाच्या साधनाने होतो आणि हे नाम 'स्वयंसिद्ध नाम' आहे. या विषयांचे मुख्य प्रतिपादन या तीन प्रकरण ग्रंथात आहे.

या तीन ग्रंथांचे विवरण मा. श्री. नारायण रघुनाथ देशपांडे यांनी केले आहे व ते येथे प्रस्तुत केले आहे. या कामी ते योग्यच होते तत्त्वज्ञान हा विषय घेऊन ते एम.ए. ची पदवी प्रथम वर्गात पास झालेले आहेत आणि श्रीदादांच्या पारमार्थिक साहित्याचा त्यांचा चांगलाच व्यासंग आहे. 'रामपाठामृत','नित्यपाठामृत','परमार्थ प्रश्नोत्तरी' या ग्रंथातील दादांच्या लेखनाला अनुसरून त्यांचे विविरण आहे, असे मला ते वाचताना जाणवले. त्यांना धन्यवाद.

श्रीदादांच्या अन्य ग्रंथांचेही श्री. देशपांडे यांनी असेच विस्तृत विवेचन करावे ,अशी इच्छा प्रगट करून येथेच थांबतो.

**सांगली** **प्रा.डॉ.के.वा.आपटे**

## आशिर्वाद

।।श्रीराम।।

परमार्थात जर काही साधायचे असेल तर तीनीच्या पलीकडे जाणे आवश्यक आहे. "कहे मच्छिंदर सुनले गोरख । तीनो उप्पर जाना । सद्गुरु की कृपा भई जब । आपे आप पछाना ।। ओही सच्चा बे सच्चा बे । ओही गुरु का बच्चा ।।" असे श्री मच्छिंद्रनाथमहाराज म्हणतात आणि या तीनीवर तीनीनेच मात करता येते. प्रत्येक माणसाजवळ तीन गुण आणि तीन दोष आहेत. रज, तम, सत्त्व हे तीन गुण व कफ, वात, पित्त हे तीन दोष. तीनीने तीनीला भागले की १/१ शिल्लक राहते. एकच गुण आणि एकच दोष. उर्ध्वगामी जीवन हा एकच गुण व अधोगामी जीवन हा एकच दोष. म्हणून तर श्रीतुकाराममहाराज म्हणतात, "संताचे संगती न करावा वास । एखादा गुण दोष येईल अंगा ।।" कारण संतांचे जवळ हा एकच गुण व एकच दोष असतो. आमच्या सारख्याकडे गुण काही यायचा नाही, दोषच यायचा. तसे होऊ नये म्हणून या तीनीवर मात करण्यासाठी

।। नित्य नेम प्रातःकाळी । मध्यान्हकाळी सायंकाळी ।।
नामस्मरण सर्व काळी । करीत जावे ।।

– श्रीसमर्थ

संधीकाळात साधली जाणारी संध्या – तीन वेळेला.

ज्ञानदेव मुक्ताईशी त्रिधा उपदेशी ।
ओहं कोहं सोऽहं साक्षी केले ।।

– उपदेश तीन वेळेला

ज्या सद्गुरुंच्या कडून हा उपदेश होतो त्यांचा शोध तीनवेळा किंवा तीनीला धरून.

तू सद्गुरु शोधुनी पहा तीनदा । आणखी नको वास गृहधंदा ।
त्याग त्याग बा विषयछंदा । तिही दिनी स्मर रे गोविंदा ।।



असे श्रीसद्गुरु श्री चिमडचे महाराज म्हणतात. हे त्यातले खरे रहस्य आहे. तसे या तीनीवर मात करण्यासाठी माझे पितृदेव, ती.प.पू.श्री.दादांची ही ग्रंथत्रयी

**आत्मबोधप्रत्ययामृत**

**श्रीदासराम–विशिंका**

**श्रीदासराम–पंचविंशि**

आणि यावरचे श्रीदादांचे कृपेतील एक साधक श्री नारायण रघुनाथ देशपांडे यांचे विवरण खास उपयोगी होईल. तसे ते आम्हास व्हावे व आत्मबोधाचा प्रत्यय यावा अशी माझे पितृदेव ती.प.पू.श्रीदादांचे चरणी मस्तक ठेवून प्रार्थना करतो व भगवान श्री सद्गुरु श्रीनिंबरगीकरमहाराज, भगवान श्रीसद्गुरु श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस व माझे आजोबा ती.प.पू.श्रीमामामहाराज केळकर यांचे चरणी अभिवादन करून येथेच थांबतो.

**।। राजाधिराज श्रीसद्गुरुनाथ महाराज की जय ।।**

सांगली — श्रीदादांचा कृपाभिलाषी
७/२/२०११ — *चंद्रशेखर*
श्री गणेश जयंती — (चंद्रशेखर रामराय केळकर)

## प्रार्थना

**ते चालतें ज्ञानाचे बिंब । तयाचे अवयव ते सुखाचे कोंभ ।**
**येर माणुसपण ते भांब । लौकिक भागु ।।१०.७७**

वर नमूद श्रीज्ञानेश्वरीतील ओवीप्रमाणे माझे आजोबा ति.प.पू. भगवान सद्‌गुरु श्रीदासराममहाराज हे मूर्तिमंत ज्ञानच अवतीर्ण झालेले होते. त्यांना बाळपणीच काव्यस्फूर्ति झालेली होती. त्यांनी आपल्या वयाच्या २० व्या वर्षापर्यंत अंदाजे १८०० अभंग लिहीलेले होते. उर्वरीत पुढील अभंग उर्वरीत पुढील वर्षात त्यांनी लिहिलेले होते. त्यांनी आपल्या संपूर्ण आयुष्यात असंख्य लेखन करुन ठेवलेले आहे. या लेखनापैकी श्रीदासराम विंशिका-श्रीदासराम पंचविशी-आत्मबोधप्रत्ययामृत हे एक लेखन होय. हे लेखन त्यांनी त्यांच्या लेखन वहीतील नोंदीनुसार सन १९५४ साली केलेले आहे म्हणजे वयाच्या ३४ व्या वर्षी लिहिलेले आहे. या तिन्ही लेखनामध्ये प्रामुख्याने त्यांनी आत्मज्ञान, आत्मसाक्षात्कार व तो होण्याकरिता करावे लागणारे साधन यांचे संक्षिप्त स्पष्टीकरण केले आहे. हे सर्व लेखन ओवीबद्ध आहे.

या सर्व ओवीबद्ध लेखनाचे विवरण माझ्या आजोबांवर अतीव निष्ठा असणारे व त्यांचा अनुग्रह प्राप्त असणारे श्री.नारायणराव देशपांडे यांनी अत्यंत सोप्या भाषेत व सर्वांना समजेल अशारितीने केलेले आहे. या पुस्तकाला दिलेले 'ग्रंथत्रयी' हे नाव अत्यंत सार्थ आहे. श्रीरामदासस्वामींची ज्याप्रमाणे श्रीमद्‌दासबोध, मनोबोध व आत्माराम ही ग्रंथत्रयी आहे त्याप्रमाणे माझ्या आजोबांची ही ग्रंथत्रयी आहे असे मला वाटते.

तरी यावर नमूद ग्रंथत्रयीच्या पठणाने आपणास आत्मज्ञान, आत्मसाक्षात्कार काही तरी व्हावा व त्या करीता करावे लागणारे साधन आमच्या हातून घडावे अशी प्रार्थना भगवान श्रीसद्‌गुरु श्रीनिंबरगीकरमहाराज, भगवान सद्‌गुरु श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस, भगवान सद्‌गुरु श्री नारायणमहाराज यरगट्टीकर, भगवान सद्‌गुरु श्रीमामामहाराज केळकर व भगवान सद्‌गुरु श्रीदासराममहाराज केळकर यांचे चरणी करतो व येथेच थांबतो.

पौष वद्य षष्ठी
श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस पुण्यतिथी,
दि. २४/०१/२०११

दीपक चंद्रशेखर केळकर



# आत्मबोधप्रत्ययामृत

**उपोद्‌घात :-**

श्रीदासराममहाराज हे फार मोठे साक्षात्कारी संत नुकतेच सांगली येथे होऊन गेले. त्यांचे हातून नानाप्रकारचे पारमार्थिक लेखन झाले आहे. त्यांच्या विविध प्रकारच्या लेखनामधील पासष्ट ओव्यांमध्ये ग्रंथित असणारा 'आत्मबोधप्रत्ययामृत' या नावाचा हा लघुग्रंथ आहे. ग्रंथाचे हे नाव शेवटच्या ओवीत आलेले आहे. आत्मज्ञान हा विषय अत्यंत सुक्ष्म स्वरुपाचा आहे. 'प्रत्यय' या शब्दाचा "प्रत्यक्ष अनुभव" असा अर्थ आहे. श्रीदासराममहाराजांचा प्रत्ययावरती फार भर आहे. आत्मप्रचीति ही सर्वश्रेष्ठ होय. ज्या गोष्टीचा प्रत्यक्ष अनुभव घेता येत नाही ते अनुमान होय. प्रत्यक्ष अनुभवात तात्त्विक भेद, विचारांमधील विरोध, विसंगती विरघळून जातात. सर्वत्र आत्माच आहे असे पाहणारा, मनन करणारा, जाणणारा मनुष्य आत्म्याचे ठिकाणी रममाण होतो. आत्म्याचेच सुख भोगतो व आनंद पावतो. श्रीदासराममहाराजानी भक्तीप्रेमातील सुख व आनंदाला अद्वैतानुभवपर अर्थ दिलेला आहे. सद्‌गुरुकृपेने सर्व चंचळाचा अर्थात प्रकृतीचा संपूर्ण निरास होतो आणि साररुप असे निश्चळ ब्रह्म तेवढे शिल्लक राहते. चैतन्य अविनाशी आहे. चैतन्य हे अमृत आहे. शरीर नष्ट झाले, दृश्य विश्व नष्ट झाले तरी चैतन्य हे कधीच नष्ट होत नाही. चैतन्य हे अमृत असल्याने ते सतत असते. त्याचा कधीच नाश होत नाही. चैतन्यरुप आत्म्याचा आनंदरुप, सुखरुप अनुभव कसा असतो आणि असा अनुभव घेण्यासाठी कोणती प्रक्रिया अवलंबावी लागते ह्याचे वर्णन या ग्रथांत दिलेले आहे. शीर्षक सुचवीत असल्याप्रमाणे या ग्रथांत आत्मज्ञान, आत्मसाक्षात्कार व त्यासाठीचे साधन यांचे संक्षिप्त स्पष्टीकरण आलेले आहे.

या लघुग्रंथाची रचना गुरु-शिष्य यांचा संवाद या माध्यमातून झालेली आहे. हा गुरु शिष्यांचा संवाद आहे. खंडन-मंडन किंवा पूर्वपक्ष-उत्तरपक्ष अशा प्रकारे येथे मांडणी केलेली नाही. शिष्याला नेमके ज्ञान प्राप्त व्हावे या हेतूने त्याच्या प्रश्नांची उत्तरे दिलेली आहेत. ह्या संवादात बहुतेक ठिकाणी ते शिष्याला विचार समजावून सांगतात. त्याला मार्गदर्शन करतात. शिष्याच्या अज्ञानाची त्यांना जाणीव आहे. त्याच्याबद्दल कळवळा व सहानुभूती आहे. येथे शिष्यानी विचारलेला प्रश्न गृहित धरुन उत्तरादाखल संवादरुपाने विवेचन केले आहे. ज्ञान-अज्ञान, सगुण-निर्गुण, द्वैत-अद्वैत असे विषय संवादरुप लिखाणात आहेत.

**नमन :-**

**ॐ नमो श्री आद्य गजानन । जेथोनी प्रगट होती तीन गुण ।**
**ज्ञान आणि अज्ञान । निवाडा होय ।।१।।**

**ज्याच्या सत्ते वर्ते मन । आधारस्थानी अधिष्ठान ।**
**जीवन कळेचे जीवन । देत असे ।।२।।**

ग्रंथाच्या प्रारंभी श्रीदासराममहाराज श्रीगजाननाला वंदन करतात. श्रीगजानन आधारस्थानी अधिष्ठित असतात. आधारचक्राचे स्थान म्हणजे नाभिचे मूळ होय. आधारस्थान ते सहस्रदळ स्थान अशी शरीरात चौदा चक्रे असून, त्या चिद्वायूच्या चौदा वर्तुळाकार गती आहेत. त्यांचा स्पर्श ज्या स्थानाला होतो त्याला चक्र ही संज्ञा आहे. श्री आद्य गजानन हे ॐकाराचे स्वरुप आहे. श्री गजानन ज्ञानस्परुप आहेत. अर्थ आकलन होण्यास अथवा अज्ञान नाहिसे होण्यास त्यांची कृपा आवश्यक असते. सत्व, रज व तम हे तीन गुण त्याच्यापासूनच उत्पन्न झालेले आहेत. त्याच्यामुळेच अनंत ब्रह्मांडाची रचना होते. त्यामुळे श्रीगजानन म्हणजे 'मूळमाया' असा अर्थ घ्यावा. मानवी जीवन चैतन्यमय आहे. त्या चैतन्याचे प्रतीक असलेले मन त्याच्या सत्तेमुळेच कार्यान्वित होते. सर्व जीवांच्या सर्वप्रकारच्या हालचाली



त्याच्या शक्तिमुळे होतात. विश्वातील चैतन्यमयता ही त्यानी दिलेल्या चैतन्यामुळेच आहे. अशा या गजाननाच्या दर्शनामुळे देहबुद्धीतून चालणारे अधोगामी जीवन उर्ध्वगामी बनते. असे उर्ध्वगामी जीवन आत्म्याची प्राप्ती करुन घेते. आणि ही आत्मप्राप्ती झाल्यामुळे ज्ञान व अज्ञान ह्या दोहोंचाही निरास होतो. याचा परिणाम म्हणून अभेदरुपाने असलेले निर्गुण ब्रह्म हाताशी येते. येथे श्रीदासराममहाराजानी दोन्ही प्रकारानी गजाननाचे मंगलचरण केले आहे. पहिले वस्तुनिर्देशरुप मंगलचरण आणि दुसरे नमस्काररुप मंगलचरण. येथे केलेले वस्तुनिर्देशरुप मंगलचरण सगुणवस्तुनिर्देशरुप व निर्गुणवस्तुनिर्देशरुप असे दोन्ही प्रकारचे आहे. जगतरुप कार्याला उपादान व निमित्त असे दोन्ही प्रकारचे कारण एक चेतन परमात्माच आहे असा वेदांत सिद्धांत 'आद्य' या शब्दाने सुचविला आहे. म्हणून 'आद्य' हा शब्द सगुणवस्तुनिर्देशरुप आहे. तसेच ॐकार हा शब्द परमेश्वराचा वाचक व मंलकारक आहे. त्यामुळे ॐकार द्वारा सगुण अशा परमात्म्याचे मंगलचरण केले आहे. तसेंच ॐकाराचे ठिकाणी निर्गुण अशा परब्रह्माची भावना दृढ करुन पुढे ॐकार अनुच्चारित झाला असता जीव ब्रह्मस्वरुप होतो. म्हणून हे निर्गुण ब्रह्मवस्तूचेही मंगलचरण ठरते. तसेच 'नमो' ह्या पदाने नमस्काररुप मंगलचरण केले आहे.

**१) तात्त्विक विचारांवरील प्रभाव :-**

**दिसे परी जया नाश । तेची कारण दुःखास ।**
**अनामे येई अनुभवास । बद्ध छंदे ।।२४।।**

**काय मृगजळाचे पाणी । आहे साठविले कोणी ।**
**काय भुसाचे कांडणी । प्राप्त आहे ।।२५।।**

श्रीदासराममहाराजांच्या ह्या लघुग्रंथात मुख्यत्वेकरुन आत्मा/ब्रह्माचे स्वरुप, जीवाचे स्वरुप, आत्मसाक्षात्काराची साधने, आत्मसाक्षात्काराचे स्वरुप ह्या संबंधीचे तात्त्विक विचार प्रकट झालेले आहेत. दासरामांच्या मते सगुण हे अखेर निर्गुणातच लय पावणारे असून निर्गुण ब्रह्माचा अनुभव

म्हणजेच अद्वैताचा अनुभव होय. महाराष्ट्रातील बहुतेक संतांच्यावरती श्रीशंकराचार्यांच्या अद्वैत तत्त्वज्ञानाचा प्रभाव पडलेला आहे. श्रीदासराममहाराजांच्या तत्त्वज्ञानावरती देखील हा प्रभाव जाणवतो. ह्या लघुग्रथांत साररुपाने आलेल्या अद्वैतपर विचारांचे विवेचन खालीलप्रमाणे आहे.

उपनिषदातील परस्परविरोधी वचनांचा समन्वय साधण्याच्या प्रयत्नातून श्रीशंकराचार्यांचे केवलाद्वैत तत्त्वज्ञान साकार झाले आहे. "ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या जीवो ब्रह्मैव नापरः" (ब्रह्म सत्य आहे. जग मिथ्या आहे. जीव हा अन्य कोणी नसून तो ब्रह्मच आहे.) इतक्या थोड्या शब्दात केवलाद्वैत तत्त्वज्ञान साररुपाने सांगता येते. या तत्वज्ञानाकडे पारमार्थिक व व्यवहारिक अशा दोन दृष्टिकोनातून पहावे लागते. पारमार्थिक दृष्ट्या निर्गुण ब्रह्म हे एकमेव अंतिम सत्य आहे तर अज्ञानी माणसाच्या दृष्टीने व्यावहारिक जगत् सत्य आहे.

### अ) जगन्मिथ्या :-

'मिथ्या' या शब्दाचा अर्थ सामान्यतः असत्य असा केला जातो. दृष्टिभ्रमाने एखादी आकृती आपल्यापुढे दिसते पण स्पर्श करु जाता हातास कांहीच लागत नाही. या अर्थाने जगास भ्रम मानले नाही. जगास 'मिथ्या' म्हणण्यातला आशय असा की, जगाकडे पाहण्याची आणि त्यानुसार जगात व्यवहार करण्याची आपली नेहमीची जी दृष्टी असते ती एकूण दृष्टी मिथ्या होय. हे जग अवकाश व कालाने मर्यादित आहे. सृष्टीतील पदार्थ परिवर्तनशील असल्यामुळे प्रत्येक पदार्थ क्षणिक आहे, नश्वर आहे. म्हणून जग सत्य ठरत नाही. परंतु जगाचा कांही क्षणापुरता का होईना पण अनुभव येतो त्यामुळे वंध्यापुत्राप्रमाणे जगाला सर्वथा अभावरुपही मानता येत नाही. याचाच अर्थ जगत् हे सत्यासत्य विलक्षण असे आहे. यालाच शंकराचार्य 'मिथ्या' असे म्हणतात. जगास 'मिथ्या' म्हणण्याचे दुसरे कारण म्हणजे ज्यास आपण जागृत अवस्थेतील व्यावहारिक अनुभव म्हणतो, त्या अनुभवाचा बाध



होऊ शकतो. स्वप्नातील अनुभव आपण मिथ्या मानतो याचे कारण म्हणजे जागे झाल्यावर स्वप्नातील अनुभवाचा बाध होतो हेच होय. शंकराचार्यांच्या मतानुसार 'अबाधित्व' हे सत्याचे लक्षण होय. जी अनुभूती अन्य कोणत्याही अनुभूतीने बाधित होत नाही व जी त्रिकालाबाधित असते ती सत्य आहे. जागृती, स्वप्न व सुषुप्ति या तीन अवस्थांचा अनुभव प्रत्येकाला येतो. यानंतर तुरीय (तुर्या) ही ज्ञानावस्था आहे. 'तुरीय' ह्या अनुभवाच्या अवस्थेत गेल्यानंतर जागृत अवस्थेत आपल्या प्रत्ययास येणारे जग बाधित होते. जे बाधित होते ते मिथ्या होय. म्हणून हे जगत् मिथ्या होय. श्रीदासराममहाराजानी ह्या नाशवंत जगाला मृगजळाची उपमा दिली आहे, अशा या मिथ्या जगापासून सुख मिळेल ही आशाच जीवाच्या दुःखाला कारण ठरली आहे. ह्या नाशवंत जगाचा निरास करण्यानेच स्वतःजवळच असूनही अप्राप्य झालेली आत्मवस्तु सापडेल असे त्यानी सांगितले आहे.

### ब) सगुण/निर्गुण ब्रह्म :-

**जयाचे जाहल्या दर्शन । होत असे ऊर्ध्व गमन ।**
**सरोनी जाण अजाणपण । येतसे निर्गुण हातासी ।।३।।**

**निर्गुण म्हणजे अद्वैत । अद्वैत म्हणजे नसे द्वैत ।**
**जेथ चैतन्य आणि चित्त । मिळणी झाली ।।५।।**

ब्रह्माचे स्वरुपलक्षण "सत्यं ज्ञानम् अनन्तं ब्रह्म" या उपनिषद वाक्याने होऊ शकते. (तैतरिय.२.१) तसेंच ज्याच्यापासून या जगाची उत्पत्ती होते ते ब्रह्म होय असे ब्रह्माचे तटस्थ लक्षण (व्याख्या) ब्रह्मसूत्रात दिले आहे. आपल्या पाच ज्ञानेंद्रियाना भासणारे गुण नित्य बदलणारे असल्यामुळे व ब्रह्म तत्त्वतः अविकार्य असल्यामुळे पारमार्थिकदृष्ट्या ब्रह्माच्या स्वरुपलक्षणांना (सत्य, ज्ञान, अनंत) निर्गुण, निर्विशेष व निष्प्रपंच ब्रह्म म्हणतात. व्यवहारिकदृष्ट्या तटस्थ लक्षण असलेल्या ब्रह्माला 'सगुण,

सविशेष व सप्रपंच' ब्रह्म असे म्हणतात. ह्या सगुण ब्रह्मालाच ईश्वर असे म्हटले जाते. श्रीशंकराचार्यांच्या मते निर्गुण ब्रह्माच्या अपेक्षेने सगुणब्रह्म हे अपरब्रह्म होय. निर्गुण ब्रह्म हेच काय ते एकमेव, अंतिम, निरुपाधिक सत्य होय. म्हणून त्यास परब्रह्म म्हणावयाचे. आणि येथेच अद्वैताचा अनुभव येतो. श्रीदासराममहाराज निर्गुण आणि अद्वैत एकच मानतात. जेथे ज्ञान आणि अज्ञान या दोहोंचाही निरास होतो तेथे अद्वैताचा अनुभव येतो. चिंतन करणे हे चित्ताचे स्वरुप आहे. चित्त हे चैतन्याचा एक अंश आहे. परमार्थात एकाग्र झालेले चित्त चैतन्यात मिसळून जाते. कारण मूलतः चित्त हे चैतन्यमय आहे. अशा चैतन्यमय चित्तास अद्वैताचा अनुभव येतो. असे हे निर्गुण हाताशी येताच द्वैत मावळते. कामक्रोध वगैरे विकार रहात नाहीत, वासना नाहीशा होतात आणि मनाला समाधान लाभते.

**क) पंचकोश :-**

**देह नव्हे रे आपण । तयासी जावे लागे टाकून ।**
**परतंत्रे सुखस्थान । सापडेना ।।३२।।**

**आपले स्वराज्य आपणासी । आपणापाशी सुखराशी ।**
**आपण कल्पिले मनासी । प्रकृतीने ।।३३।।**

**तरी मन ही नव्हे आपण । आपुल्या इच्छे वर्ते मन ।**
**मने जीवित्व जीवन । देहालागी ।।३४।।**

**अनंतत्वे जाहला प्राण । तरी तयाचे पैल आपण ।**
**पंचकोशातीत पूर्ण । एकमेव ।।३५।।**

वेदांतामध्ये पंचकोशांची मांडणी वैशिष्ट्यपूर्ण अशी आहे. अन्नमय, प्राणमय, मनोमय, विज्ञानमय व आनंदमय असे पाच कोश आहेत. ज्याची उत्पत्ति अन्नापासून होते असा स्थूल देह म्हणजे अन्नमय कोश आहे. पंचकर्मेंद्रिये व पंचप्राण अशा दहा अवयवांनी युक्त असा प्राणमय कोश आहे. पाच ज्ञानेंद्रिये व सहावे मन अशा सहा अवयवांचा मनोमय कोश



आहे. पांच ज्ञानेंद्रिये व सहावी बुद्धी मिळून सहा अवयवात्मक विज्ञानमय कोश आहे. प्रिय, मोद व प्रमोद असे वृत्तित्रयात्मक जे अज्ञान तेच आनंदमय कोशाचे स्वरुप आहे. इष्टवस्तूंच्या प्राप्तीने होणाऱ्या संतोषास मोदवृत्ति म्हणतात. इष्ट वस्तूंच्या दर्शनाने होणाऱ्या संतोषास प्रियवृत्ति म्हणतात. इष्टवस्तूंच्या भोगाने होणाऱ्या संतोषास प्रमोदवृत्ति म्हणतात. आनंदमय कोशातील होणारा आनंद हा लौकिक स्वरुपाचा असून तो सोपाधिक आहे. उलट आत्म्याचे आनंदमयत्व निरुपाधिक आहे. आत्मा हा पंचकोशापैकी कोणताही कोश नसून तो पंचकोशातीत आहे. अशारीतिने पाच ही कोशापलीकडे असलेला आत्मा सत्, चित् व आनंद असा आहे. श्रीदासराममहाराजानी शरीरातील आत्म्याचे नेमके स्थान व स्वरुप याविषयी पंचकोशाच्या संदर्भाने वर्णन केले आहे. हा साक्षिभूत, कूटस्थनित्य आत्मा काय तो सत्य व त्याच्या अपेक्षेने जीव, म्हणजे कोशयुक्त जीव हासुद्धा असत्यच होय, असा निष्कर्ष त्यांनी काढलेला आहे.

**ड) अध्यारोप व अपवाद :-**

**जीव शिव भेदे दोन । दिसती अभेदे परिपूर्ण ।**
**भेद केला जो निर्माण । काटोनी टाकी ।।१९।।**

**आत जैसा जैसा गेलासी । तैसा तैसा बाहेर येसी ।**
**तरी तुझिये भाग्यासी । पार नाही ।।२०।।**

ब्रह्म ही एकमेव सत्य वस्तु आहे. परंतु अज्ञानामुळे त्याचा अनुभव येत नाही. ज्या क्रमाने आपण ब्रह्मापासून/शुद्ध चैतन्यापासून दूर झालो त्याच्या उलट क्रमाने शुद्ध चैतन्याप्रत जाता येते, अशी प्रक्रिया सांगणारे विचार श्रीदासराममहाराजांनी मांडलेले आहेत. या संबंधाने श्रीशंकराचार्यानी अध्यारोप व अपवादाचा केलेला अधिक खुलासा असाः-

**अध्यारोपः-**

अध्यारोपात ब्रह्मावर विवर्तरुपाने अज्ञान इत्यादींचा प्रपंच म्हणजे विस्तार

भासतो. एक वस्तू जेंव्हा भिन्न प्रकारची वा स्वरुपाची भासते तेंव्हा त्या भासण्याला 'विवर्त' किंवा 'अध्यास' असे म्हणतात. ब्रह्मावर जगाचा अध्यारोप होताना कांही विशिष्ट पद्धतीने व क्रमाने ब्रह्मावर जग भासू लागते. त्या पद्धतीला अध्यारोपाची प्रक्रिया म्हणता येते. प्रथम ब्रह्माला अज्ञानाची उपाधि येते व यापासूनच पुढे विश्वाची निर्मिती होते. उपाधि म्हणजे ती गोष्ट की जिच्यामुळे एखाद्या वस्तूला मर्यादा पडली असे वाटते अथवा दुसऱ्या वस्तूचे स्वरुप बदलले असे वाटते. उदा. घटामुळे आकाश हे मर्यादित होऊन लहान असे घटाकाश झाले असे वाटते, म्हणून येथे घट ही आकाशाची उपाधि होते. तसेच, पांढऱ्या शुभ्र स्फटिकाजवळ लाल रंगाचे फूल ठेवले की तो स्फटिक लाल रंगाचा आहे असे भासू लागते, म्हणून येथे लाल फूल ही स्फटिकाची उपाधी होय. ब्रह्माला येणाऱ्या 'अज्ञान' या उपाधीने या दोन्हीही गोष्टी घडतात.

**अपवादः-**

शुद्ध चैतन्याच्या अधिष्ठानापेक्षा विवर्तरुप पदार्थाला स्वतंत्र अस्तित्व नाही हे कळणे म्हणजे अपवाद होय. कार्यकारण भाषेत सांगावयाचे झाल्यास कारणापेक्षा कार्याला स्वतंत्र अस्तित्व नाही. विश्व हे कार्य, चैतन्य या कारणरुपानेच आहे अथवा चैतन्यापेक्षा विश्वाला स्वतंत्र अस्तित्व नाही असे जाणणे म्हणजे अपवाद होय. थोडक्यात अध्यारोपात अज्ञानाची उपाधि असणाऱ्या चैतन्यापासून आकाश, आकाशातून वायु, वायूपासून तेज, तेजापासून जल आणि जलापासून पृथ्वी असा उपपत्तीचा क्रम आहे. अपवादात पृथ्वीपासून प्रारंभ करुन जल, तेज, वायु व आकाश अशा उलट क्रमाने त्यांचा लय करुन शुद्ध चैतन्याप्रत जाता येते.

**तात्त्विक विचारः-**

आत्मसाक्षात्कार करुन घेणे म्हणजेच मोक्ष मिळविणे होय. आत्मसाक्षात्काराच्या लाभामुळेच जीवनसाफल्य लाभेल असे श्रीदासराममहाराजाना वाटते. आत्मसाक्षात्काराच्या मार्गावर प्रवास करताना



ब्रह्म/आत्मा, जीवाचे स्वरुप, साधनमार्ग इ. विषयासंबंधाने त्यांनी कथन केलेले विचार सुसंगतपणे मांडून त्याचे विवरण खालीलप्रमाणे केले आहे.

**अ) ब्रह्म/आत्मा/परमात्मा :-**

**आत्मा शाश्वत स्वतंत्र । आत्मा व्यापक सर्वत्र ।**
**देह अशाश्वत परतंत्र । विचारे कळे ।।३१।।**

**अरे आत्मा आत्मरुपे । देहावीण राहे अपापे ।**
**तयाच्या इच्छे तयाच्या कोपे । सर्वची घडे ।।३०।।**

**मुळी पाहता सर्वची देव । एकची एक नान्यभाव ।**
**प्रेमस्वरुपाचा ठाव । लाघवी जो ।।११।।**

**प्रेम तोडिता तुटेना । प्रेम जाळिता जळेना ।**
**आकर्षणे पंचप्राणा । आकळील ।।१२।।**

**प्रेमे एकवटले सकळ । अद्वैत ब्रह्मस्वरुप निर्मळ**
**दुजाभाव नुरेची केवळ । शोधावया ।।१३।।**

ब्रह्म म्हणजेच आत्मा होय. यालाच परमेश्वर असे म्हणतात. मानवी देह हा अशाश्वत असून तो कधी ना कधीतरी जाणार आहे. म्हणूनच तो परतंत्र आहे. परंतु मानवी देहात असणारा आत्मा मात्र शाश्वत स्वरुपाचा आहे. तो स्वतंत्र आहे. हा आत्मा देहामध्ये तसेच सर्व सृष्टीमध्ये व्यापून उरला आहे. तो सर्वव्यापक आहे. त्याला नाश नाही. शरीरामध्ये त्याचे स्थान म्हणजे तो पंचकोशातीत आहे. तसेच त्याच्यामध्ये कोणतीही अपूर्णता नाही. तो एकमेव आहे. असा हा आत्मा सुखरुप आहे. याचे कारण आत्मा व सुख ह्यांचे लक्षण एकच असणे हे आहे. सर्व पदार्थांची इच्छा सुखाकरिता असते, पण सुखाची इच्छा कोणत्याही अन्य पदार्थाकरिता नसते, तर स्वयंसुखाकरिताच असते. हेच लक्षण आत्म्याला लागू आहे. सर्व पदार्थ आत्म्याकरिता आहेत पण आत्मा मात्र कुणाहीकरिता नाही. माणसाच्या

आयुष्यात अथवा या जगतामध्ये घडणाऱ्या सर्व चांगल्या किंवा वाईट घटना त्या केवळ आत्म्याच्या इच्छेनेच घडतात. दुसरे असे की आत्म्याच्या सुखामध्ये निरुपाधिक प्रेम अंतर्भूत असते, उलट अन्य वस्तूविषयीचे प्रेम सोपाधिक असते. आत्म्याची ही परमप्रेमास्पदता सिद्ध करण्यासाठी बृहदारण्यक उपनिषदात याज्ञवल्क्यांनी म्हटल्याप्रमाणे माता, पिता, पुत्र, पत्नी, धन आदि वस्तू आत्म्याकरिता प्रिय आहेत. उलट आत्मा मात्र आत्म्याकरिताच प्रिय आहे, अन्य कोणाकरिताही प्रिय नाही. त्या अर्थी आत्मा हीच अत्यंत प्रेमार्ह वस्तू आहे. श्रीदासराममहाराजांच्या मते आत्मा प्रेमस्वरुप आहे. आणि चैतन्यामुळे प्रेम आहे. या प्रेमामुळेच आकर्षण आणि खेच निर्माण होते. विश्वामध्ये एकमेकाकडे असलेले आकर्षण/खेच प्रेमामुळे होय. चैतन्याचे आकर्षण म्हणजे विशुद्ध प्रेम होय. सगळीकडे हा प्रेमस्वरुप ईश्वरच वास करीत आहे. शरीराला जसे पंचप्राणांचे आकर्षण आहे, तसे सारे अनंत विश्व एकमेकाकडे प्रेमानेच खेचले जात आहे. हे प्रेम अविनाशी स्वरुपाचे आहे. ते तोडल्याने तुटत नाही अथवा जाळिता जळत नाही. असे हे निर्मळ अद्वैत ब्रह्मस्वरुप, प्रेमाने एकवटलेले असून तिथे शोधून सुद्धा प्रेमाशिवाय अन्य कोणताही भाव उरत नाही.

**ब) आत्म्याचे स्थान :-**

**अनिर्वाच्य सुखस्थान । तेथे माझे सिंहासन ।**
**निरिच्छासी आत्मपण । प्राप्त होय ।।३६।।**

आत्मा हा सच्चिदानंदरुप आहे. आता प्रश्न उद्भवतो तो असा की, या लौकिक जीवनामध्ये सुद्धा कांही वस्तू चेतन भासतात, आनंदरुप वाटतात, त्या आत्मरुप मानता येतील काय? त्यांच्यामध्ये भासणारे चैतन्य, आनंद आदि गुण आणि आत्म्याची चैतन्य आणि आनंद ही लक्षणे एक मानावीत काय? याबाबत श्रीदासराममहाराजांनी आत्म्याची पंचकोशाशी केलेल्या तुलनेवरुन काढलेला निष्कर्ष, स्पष्ट होतो.



शाश्वत व सर्वव्यापक अशा सुखरुप आत्म्याचे देहातील स्थान शोधताना स्वतःच्या देहालाच आत्मा समजून, जीव मिथ्या अभिमान धरतो. पण देह म्हणजे आत्मा नव्हे. कारण देह हा शाश्वत नाही. पृथ्वी, आप, तेज, वायु व आकाश या पंचमहाभूतांनी बनलेला हा देह परतंत्र असून एक ना एक दिवस नाश पावणारा आहे. म्हणून शाश्वत सुखाचे स्थान असलेला आत्मा म्हणजे हा देह नव्हे हे विचारांती कळते. अशा या देहामध्ये आपणाजवळच सुखाची रास असलेला आत्मा आहे. परंतु मायेमुळे जीव मनाची कल्पना करतो. प्रकृति म्हणजे माया. माया म्हणजे अज्ञान. माया ही चंचल असून मायेमुळेच उपाधि निर्माण होते. उपाधि अज्ञानावर टिकून असतात. शरीर, मन, बुद्धी, चित्त व अहंकार या उपाधि होत. असे हे स्वतःच्या इच्छेने वागणारे व शरीरासाठी निर्माण झालेले मन म्हणजेच आत्मा अशी जीव कल्पना करतो. परंतु ज्या देहासाठी मन कार्यान्वित होते तो देहच नाशवंत आहे हे त्याला विचारांती कळते. त्यामुळे मन म्हणजे आत्मा नव्हे हे त्याला उमगते. मनामध्ये चैतन्यनामक धर्म दिसून येतो खरा परंतु मनाची अवस्था विषयाविषयानुसार बदलत असल्यामुळे मन विकारी ठरते. तसेच आत्मा सर्वदा वर्तमानस्वभाव आहे तर बुद्धीचे कार्य सुषुप्तावस्थेमध्ये प्रतीत होत नाही. त्यामुळे मन आणि आत्मा तसेच बुद्धी आणि आत्मा एक मानता येत नाहीत. प्राण, अपान उदान, व्यान व समान असे पाच प्राण देहात असतात. या पंचप्राणामुळे शरीराचे चलनवलन चालते. हालचाल वा क्रियाशीलता हा जरी पंचप्राणांचा स्वभाव वाटत असला, तरी ते चेतन नसल्यामुळे त्याचीही तुलना चैतन्यमय आत्म्याशी करता येतं नाही. म्हणजेच पंचप्राण म्हणजे आत्मा नसून खरा एकमेव आत्मा हा पंचकोशातीत असून तोच पूर्ण आहे. तैतरिय उपनिषदात (२.२५) एका रुपकाच्या सहाय्याने आत्मा व जीव यातील फरक विशद केलेला आहे. त्यावर भाष्य करताना श्रीशंकराचार्यांनी त्या रुपकाचा थोडा विस्तार करून 'पंचकोश' नावाची संकल्पना रुढ केली. आत्म्यावरती अन्नमयकोश,

प्राणमयकोश, मनोमयकोश, विज्ञानमयकोश आणि आनंदमयकोश अशी एकावर एक पांच आवरणे अथवा कोश आहेत. त्यां कोशांसह आत्मा घेतला की त्यास 'जीव' म्हणता येईल, आणि ही आवरणे काढल्यावर जे उरते तेच त्याचे सत्य स्वरुप होय. असा हा सुखरुप आत्मा प्राप्त होण्यासाठी जीवाने जो मुळातच आत्म्यावर विसंबून आहे त्या देहाचा भरवसा धरु नये. स्वतःच पराधीन असलेल्या देहाचा मिथ्या अभिमान धरुन सुखरुप आत्मा प्राप्त होणार नाही. पंचकोशांचे आकर्षण सोडून जीव जेंव्हा निरिच्छ होतो तेंव्हाच त्याला सुखरुप आत्मा गवसतो. पंचकोशांच्या उपाधिंचा नाश होताच आत्म्याचे ज्ञान होते. अशा आत्म्याचे स्वरुप शब्दांनी सांगता येत नाही म्हणून त्याचे वर्णन 'अनिर्वाच्य' असे केले जाते.

**क) जीवः- अ) जीवाची उत्पत्ती :-**

**एकची जाहले अनंत । अनेकत्वे निर्मिले द्वैत ।**
**जीव जाहले उपाधिभूत । भासे आभास भासला ।।१४।।**

**ओखटे गेलिया उरे सत्य । सत्य विसरता उरे असत्य ।**
**सत्य परिपूर्ण यथार्थ । सुखरुप ।।२३।।**

**देहाचा मिथ्या अभिमान । धरुनी सुखी होय कोण ।**
**मुळीच जो पराधीन । आत्म्यावरी ।।२९।।**

निर्गुण व निश्चळ ब्रह्म हे अंतिम तत्त्व आहे. निश्चळ ब्रह्मात चंचळ निर्माण होते. निश्चळ ब्रह्मात भासणाऱ्या या चंचळाला 'मूळमाया' म्हणतात. एकमेव व अद्वैतरुप असलेल्या ब्रह्मात उत्पन्न होणाऱ्या चंचळ गुणामुळे विश्वाची निर्मिती होते. तथापि चंचळ मायेमुळे आकारास आलेले हे विश्व सत्य नाही. हे जगत् म्हणजे परब्रह्मावरचा एक भास आहे. शिंप्यावर जसा रुप्याचा भास होतो तसा ब्रह्मावर विश्वाचा भास होतो. त्यामुळे हे सारे जगत् ब्रह्मच असूनही अज्ञानाने ते वेगळे आहे, ते खरे आहे असे वाटते, तसेच तत्त्वतः खोटे असणाऱ्या या जगात देह, मन इत्यादीच्या उपाधित सापडलेला



जीव सुद्धा तत्त्वतः ब्रह्मच आहे. वेदांताने मूळमायेचे माया आणि अविद्या असे दोन प्रकार मानले आहेत. ब्रह्माशी संलग्न पण एकरुप नव्हे असे अज्ञान/मूळमाया/मूला अविद्या आहे. ब्रह्माचे मायेत पडलेले प्रतिबिंब 'ईश्वर' असून, अविद्येत पडलेले प्रतिबिंब 'जीव' होय. अज्ञानाच्या ठिकाणी आवरण आणि विक्षेप अशा दोन शक्ती असतात. अज्ञानाच्या या दोन शक्तिपैकी ईश्वराच्या ठिकाणी फक्त विक्षेपशक्ती असते. या शक्तीमुळे नामरुपात्मक जगाची निर्मिती होते. हा ईश्वर जरी प्रतिबिंब असला तरी मायेची 'आवरण' शक्ती त्याच्यावर प्रभाव पाडू शकत नाही. त्यामुळे तो मायेचा दास नसून तिचा तो स्वामी आहे. परंतु जीवांच्या बाबतीत अज्ञानाच्या आवरण आणि विक्षेप या दोन्ही शक्ती कार्यकारी असतात. प्रत्येक जीवाचा संबंध अंतःकरण नामक उपाधीशी येत असल्यामुळे जीव सोपाधिक म्हणून सीमित आणि अल्पज्ञ ठरतो. ईश्वरामध्ये अविद्येचा अंश नसतो. तथापि अविद्येतूनच जीवाची निर्मिती असल्यामुळे अविद्या जीवाचे जीवन ठरते. अविद्या मलिनसत्वप्रधान असल्यामुळे तिच्यामध्ये रजोगुण आणि तमोगुण ह्यांचे प्राबल्य असते व त्याच्यामुळे कर्ता, भोक्ता, बद्ध वगैरे वृत्ती निर्माण होतात. मायेमुळे द्वैत आहे. माया ही द्वैताची जननी आहे. पंचमहाभूते आणि तीन गुण मिळून बनणाऱ्या अष्टधा प्रकृतीलाच म्हणजे मायेलाच 'दृश्य' हे नावं आहे. विश्वातील नाम आणि रुप मायेमुळे आहे. विश्वातील अनुभव आणि अनुभव घेणारा, हे द्वैत मायेमुळे आहे. विनाशी असे जे दृश्य दिसते व मनास भासते हा सर्व फसवा देखावा आहे. मानवी देहामधील जीव हा मूलतः ब्रह्मरुप/चैतन्यरुप आहे. परंतु हा जीव उपाधीनी बांधलेला आहे. उपाधीभूत जीवनात पृथ्वी, आप, तेज, वायु आणि आकाश ही तत्त्वे असतात. जड आणि चैतन्य ही दोन्ही तत्वे उपाधीभूत जीवनात असतात. बाह्य दृश्याची उपाधि व देहामधील उपाधीभूत जीवन ह्यामुळे जीवाला नामरुपात्मक जग सत्य वाटते व जोपर्यंत जीवाला नामरुपात्मक जग सत्य वाटते तो पर्यंत द्वैत भासते.

**ब) जीवाच्या दुःखाचे स्वरुप :–**

**भेदे शहाणे नाडले । वेड सर्वासी लाविले ।**
**सुखी दुःखी गुंतविले । भ्रमयोगे ।।२१।।**
**जे मुळातची द्वैत । त्याचे कैसेनी होईल अद्वैत**
**असत्यामाजी होऊन भ्रांत । दुःख येईल हातासी ।।१०।।**

नामरुपात्मक जगाला सत्य मानल्याने जीव सुखदुःखाच्या भोवऱ्यात अडकतो. जो पर्यंत द्वैत आहे तोपर्यंत जीवाला सुखदुःखाचा अनुभव येतच राहणांर. स्वतःच्या देहापासून ह्या जगामध्ये जे जे कांही दृश्य स्वरुपात आहे, ते ते शाश्वत नसून त्याचा नाश निश्चित आहे. बाह्य पदार्थ हे सतत टिकणारे नसून ते नष्ट होणारे, संपणारे असतात. साहजिकच नाशवंत पदार्थापासून मिळणारे सुख हे नाशवंत, तत्कालीन, क्षणिकच असते. या सर्वाचा अर्थ इतकाच की, जगातील बाह्य पदार्थापासून जीवाला सततचे न संपणारे सुख मिळत नाही. उलट तेच त्याच्या दुःखाला कारण ठरते. नाशवंत देहापासून तसेच बाह्य नामरुपात्मक जगापासून सुख प्राप्त करणे म्हणजे मृगजळाचे पाणी साठविण्यासारखे किंवा भुसाचे कांडण करून दाणे प्राप्त करुन घेण्यासारखे आहे. जीव या जगात वावरत असतो. या जगात शब्द, स्पर्श, रुप, रस आणि गंध असे पाच प्रकारचे विषय आहेत आणि जीव हा विषयापासून, त्या त्या पदार्थापासून सुख प्राप्त करुन घेण्याचा प्रयत्न करतो. जगातील ज्या विषयापासून सुख मिळविण्याची धडपड जीव करतो, ते विषय पृथ्वी, आप, तेज, वायु आणि आकाश या पंचमहाभूतांच्या मिश्रणापासून बनलेले आहेत. जीव हा इंद्रिय–जन्य सुखाच्या मागे धावतो. बाह्य जगातून जे सुख जीवाला मिळते ते खरे सुख नसून तो केवळ सुखाचा आभास असतो. दुसरे असे की देह म्हणजेच मी समजून अज्ञानाने जीव स्वतःला कर्ता, भोक्ता समजतो. परंतु देह हा आत्म्याच्या आधीन आहे. अशा मुळातच पराधीन असलेल्या देहाचा अभिमान धरुन कोणीही सुखी होणार नाही. नाशवंत असे दृश्य असत्य आहे हे कळल्यानेच सत्य (आत्मा)



म्हणजे काय ते कळेल. परिपूर्ण आणि निश्चळ आत्मज्ञानाने दुःखाचा नाश होऊन सुखरुपता प्राप्त होईल.

**क) जीवाला उपदेश :–**

**आपणची स्वप्न केले निर्माण । मोक्ष बंधन दुःख शीण**
**तेथे भ्यावे कासया म्हणून । आपणासी ।।१६।।**

**आपण व्हावे पराधीन । यात कायसे भूषण**
**काय आहे उणीवपण । आपणामाजी ।।२२।।**

**अरे जे खोटेची आहे । ते नाही म्हटल्या वावगे काये**
**सर्व नाही करोनी पाहे । निजवस्तू ।।२६।।**

**ऐसे करोनी पाहता बरे । तेथ अहंभाव विरे**
**नामघोष जयजयकारे । सद्गुरुंच्या ।।२७।।**

**काय चित्रीची ते सेना । येईल तुझ्या संरक्षणा**
**काय अंधळा दावी खुणा । वाटसरुसी ।।२८।।**

मूळ परब्रह्म विज्ञानस्वरुप आहे. विज्ञान म्हणजे ज्ञान व अज्ञान यानी रहित अशी स्थिती. परब्रह्मापासून जीव आणि शिव होतात. एकाच तत्त्वाच्या दोन बाजू म्हणजे जीव शिव आहेत. म्हणजे परब्रह्माला येणाऱ्या उपाधीअंती जीव व शिव अशी भाषा येते. मानवी देहात देह इत्यादींच्या जड उपाधीत सापडून अज्ञानाने जीव होतो, तर साक्षी चैतन्यरुपी ज्ञानाच्या उपाधीने शिव होतो. जीवाचे लक्ष दृश्य जगाकडे आहे तर शिवाचे लक्ष चैतन्याकडे आहे. जीव हा पिंडाशी संबंधित आहे तर शिव हा ब्रह्मांडाशी संबंधित आहे. जीव व शिव हे दोघेही मानवी शरीरातील सहस्रदलस्थानात आहेत. मानवी शरीरात नाक, कान, डोळे, तोंड व टाळू या पाच छिद्रांनी जोडलेले अंतराकाश म्हणजे सहस्रदलस्थान होय. सहस्रदलस्थान मेंदूलाच समजले जाते. सहस्रदलस्थानातच आत्म्याचा अनुभव येतो. जीव आणि

शिव हे या सहस्रदलस्थानात एकमेकाकडे पाठ करून आहेत. जीव आणि शिव यामध्ये असलेला भेद जर आपण प्रयत्नाने मिटविला तर दोहोंची ऐक्यता होऊन हा भेद रहात नाही. आणि सर्व प्रकारची परिपूर्णता होते. उपाधीत सापडलेल्या जीवाला परब्रह्माकडे जाण्यासाठी 'शिव' हे माध्यम आहे. एकमेकाकडे पाठ करुन असलेले जीव-शिव हे समोरासमोर येऊन त्या दोघांची दृष्टादृष्ट होणे आवश्यक आहे. जेव्हा जीवात्म्याची व शिवात्म्याची दृष्टादृष्ट होते, तेव्हा जीवात्मा व शिवात्मा हे दोघे परब्रह्मात जाऊन मिसळतात. शरीर इत्यादींच्या जड उपाधीत सापडून अज्ञानाने जीव होतो. मन, चित्त, बुद्धि, अहंकार हे अंतःकरणचतुष्टय ह्या उपाधीच आहेत. ज्याक्रमाने उपाधीमुळे आत्म्याला जीवपणा प्राप्त झाला आहे त्याच्या उलट क्रमाने ह्या उपाधींचा निरास केला असता जीवा-शिवाची गांठ पडते. असे केल्याने भवाचे/संसाराचे अस्तित्व सुद्धा रहात नाही. असा जीवा-शिवाचा संयोग होण्याचा अनुभव घेणे, ही मानवी जीवनात परमभाग्याची गोष्ट आहे. या दोहोंची मिळणी होताच त्याठिकाणी आत्मसुखाची प्राप्ति होते. वास्तविक पाहता जीव हा आत्मस्वरुपच आहे. अशा शुद्ध आत्मस्वरुपामध्ये कोणताही भेद नाही, उणीव नाही. ते एकमेव असून पूर्ण आहे. वास्तविक पाहता जे आपणाजवळच आहे परंतु त्याचे वर्म न कळल्याने जीव पराधीन झालेला आहे. अशा तऱ्हेने भ्रमाने पराधीन होऊन सुखदुःखात गुंतून राहण्यात जीवाला कोणतेही भूषण नाही. मायेने निर्मिलेले असे हे नाशवंत व जड दृश्य खोटे आहे. आणि जे मूळातच असत्य/खोटे आहे त्याला खोटे असे संबोधण्याने कांहीच वावगे होणार नाही. अशा या दृश्याचा/उपाधींचा निरास करुन जीवाने निजवस्तुचे म्हणजेच आत्म्याचे ज्ञान प्राप्त करुन घ्यावे. आत्मसाक्षात्कारानंतर अहंकार शिल्लक रहात नाही. जीवभाव रहात नाही. परंतु हे सारे प्राप्त करुन घेण्यासाठी आत्मज्ञानी अशा सद्गुरुंना शरण जाणे अत्यंत आवश्यक आहे. चैतन्य हेच सद्गुरुंचे स्वरुप आहे. देहातीत व निरुपाधिक जीवन हेच त्यांचे खरे स्वरूप होय. देहातीत व दृश्यातीत अशा



आत्म्याला दाखविण्यासाठी सद्गुरुंची आवश्यकता आहे. सद्गुरु म्हणजे केवळ देहाकृति नव्हे. चित्शक्ति, चैतन्य, सद्गुरु हे सर्व एकच आहेत. सद्गुरू त्रिगुणांचे अतीत असतात. परमार्थ मार्गातील सद्गुरु आणि या जगातील व्यावहारिक ज्ञान देणारे, मार्गदर्शन करणारे गुरु/मार्गदर्शक यांची तुलना होऊ शकत नाही. आत्मज्ञानासाठी प्रपंचातल्या/संसारातल्या ज्ञानाचा अनुभव व अधिकारी असणाऱ्या गुरुंचा आश्रय घेऊन कांहीही साध्य होणार नाही. आत्मसाक्षात्कारासाठी सद्गुरुवाचून अन्य गोष्टींचा आश्रय घेणे म्हणजे कागदावर काढलेल्या चित्रामधील सैन्याला स्वतःच्या संरक्षणासाठी बोलावणे किंवा स्वतःच आंधळा असताना दुसऱ्या वाटसरुंना मार्ग दाखविण्यासारखे होईल. असे असण्याचे कारण म्हणजे प्रपंचातले ज्ञान व अनुभव आणि परमार्थतल्या आत्म्याचे ज्ञान व अनुभव या पूर्णतः वेगवेगळ्या गोष्टी आहेत. त्यांची पातळी समान नाही. म्हणून आत्मसाक्षात्काराची वाट दाखविणारे जे सद्गुरु आहेत त्यांना शरण जाणे अत्यंत आवश्यक आहे.

**ड) साधन मार्ग :-**

**पंचवीस तत्त्वासी गिळिता । मन बुद्धी छेदोनी जाता**
**सतरावी प्रदीप्त होता । माझे स्वरुप न्याहळे ।।३७।।**

**सकळासी आहे नाश । ही तो खूण बाणता मनास**
**नामे होई सर्व ग्रास । सहाजेची ।।३८।।**

**सोहं शब्द झणत्कारे । मन बुद्धी छेदोनी जासी सत्वरे**
**नाम संकीर्तन गजरे । गुरुकृपे ।।३९।।**

**नाद उमटे देहाभीतरी । पाहे परेचिया उपरी**
**सत्यासत्य विचारे निर्धारी । एकांती पा ।।४०।।**

**बहुत नाद देहाभीतरी । उठती अहर्निश साचारी**
**गुरुभक्त जाणती नवलपरी । एकविध ।।४१।।**

**ऐकोनिया पडसाद । ओळखिला आत्मनाद**
**तोचि झाला स्वतःसिद्ध । नादरुप ।।४२।।**

**नादाने लागला नाद । नादे जाहला प्रबोध**
**जाहला अखंड प्रसाद । अंतर्यामी ।।४३।।**

**राहिला आत्मरुपी बिलगून । माया ममता टाकिली झाडून**
**पराधीनता अनन्यपण । धरोनिया टाकिली ।।४४।।**

श्रीदाराममहाराजांच्या मते 'देह' या उपाधीचा निरास होणे आवश्यक आहे. देहाची जाणीव सुटून आत्म्याचे स्मरण रहाणे म्हणजे साधन आहे. देहामध्ये पंचवीस तत्त्वे आहेत. या पंचवीस तत्त्वासह मन व बुद्धी यांचा निरास करण्याने देहाची जाणीव सुटते. पृथ्वी, आप, तेज, वायु, आकाश ही पंचमहाभूते, शब्द, स्पर्श, रस, रुप व गंध हे पाच विषय, हात, पाय, वाणी, शिश्न व गुदा ही पाच कर्मेंद्रिये, श्रोत्र, त्वचा, नेत्र, जिव्हा आणि नासिका ही पांच ज्ञानेंद्रिये, अंतःकरण, मन, बुद्धी, चित्त आणि अहंकार असे अंतःकरणपंचक, असे सर्व मिळून पंचविस तत्त्वे होतात. तसेच दुसऱ्या तऱ्हेने ही पंचवीस तत्त्वांची मिळणी होते. देह हा पृथ्वी, आप, तेज, वायु व आकाश या पंचमहाभूतानी बनलेला आहे. प्रत्येक महाभूतात उरलेली चार महाभूते सूक्ष्म प्रमाणात असतातच. जसे एक पृथ्वी तत्त्व घेतले तरी त्यात आप, तेज, वायु व आकाश ही तत्त्वे असतातच. अशी एकूण (५X५=२५) पंचवीस तत्त्वे झाली. अशा या पंचवीस तत्त्वांच्या निरसनानंतर सहस्रधारा चक्रामधील सतरावी जीवनकळा प्रदिप्त होऊन स्वरुपाचा (आत्म्याचा) साक्षात्कार होतो. अमृता, मानदा, पूषा, तुष्टी, पुष्टी, रती, धृती, शशिनी, चंद्रिका, कांती, जोत्स्ना, श्री, प्रीती, अंगदा, पूर्णा आणि पूर्णामृता अशा चंद्राच्या शरीरावर षोडश कला भासतात. षोडश कलाशिवाय चंद्राचे कलारहित असे स्वस्वरुप साक्षित्वाने असते. त्यास सतरावी कला म्हणतात. चंद्राच्या या सोळा कला ज्यावरती अधिष्ठित असतात ती सतरावी



जीवनकळा/अमृतकळा मानली जाते. पंचवीस तत्त्वांच्या निरसनानंतर ही अमृतकळा तप्त होते आणि परिणामस्वरुप आत्मसाक्षात्कार होतो. आत्मसाक्षात्कार फक्त ज्याच्यावर गुरुकृपा आहे अशा गुरुभक्तालाच होतो. त्यासाठी कोणते साधन आहे, हा साधनमार्ग कसा आहे हे पुढील ओव्यामध्ये स्पष्ट केले आहे.

सर्व गोष्टी नाशवंत आहेत हे लक्षांत घेऊन पंचवीस तत्त्वांच्या निरसनासाठी सद्गुरुंनी 'नाम' हेच साधन दिलेले आहे. सद्गुरुंनी दिलेल्या नामाची खूण मनामध्ये बिंबणे गरजेचे आहे. अशा अंगी बाणलेल्या नामामध्ये सर्व उपाधींचा ग्रास करण्याचे सामर्थ्य असते. परंतु यासाठी देहात सहजपणे स्फुरणाऱ्या नामाची ओळख पटणे, त्याची खूण अंगी बाणणे गरजेचे आहे. आत्मा/परमेश्वर म्हणजे चैतन्य होय. नाम म्हणजे चैतन्याचा नाद आहे. आणि चैतन्याचा होणारा नाद म्हणजे खरे 'नाम' आहे. चैतन्य आणि चैतन्याचे नाम वेगवेगळे नाहीत. नाद हेच खरे मूळ आहे. वाणीने चैतन्याचा प्रत्यक्ष उच्चार करताच येत नाही. आपल्या मानवी शरीरात नामाचा म्हणजेच चैतन्याचा ध्वनी सतत उमटत असतो. गतीरुप आणि ध्वनीरुप असलेला हा नाद देहात सतत घुमत असतो. शरीरात अखंडपणे स्फुरणारे नाम म्हणजे 'सहजनाम' होय. नामाचा नाद म्हणजे शरीरात आपोआप चोवीस तास दुमदुमणारा चैतन्याचा नाद होय. स्थूल, सूक्ष्म, कारण आणि महाकारण या चारही देहामध्ये या रामनामाचे स्फुरण अखंड होत असते. परा, पश्यंती, मध्यमा आणि वैखरी या चारही वाणीत नाम आहे. इतकेच नव्हे तर परेच्या पल्याड देखील या नादरुप नामाचे स्फुरण अखंड चालू आहे. परंतु हा ध्वनी ऐकावयाचा असेल तर माणसाने प्रथम आपल्या इच्छा कमी केल्या पाहिजेत. तसेंच शरीरात होणाऱ्या रामनामाचा ध्वनी ऐकण्यास प्रयत्नपूर्वक तिकडे लक्ष द्यावे लागते. आपली वृत्ती संथ करुन तो नाद ओळखावा लागतो. एकदा आत्मनादाचा पडसाद ऐकू येऊ लागला म्हणजे त्या नादाचाच नाद लागतो. आणि चित्तामध्ये आत्मज्ञानाचा बोध उमटतो. त्यामुळे अखंड

प्रसन्नतेचा लाभ घडतो. नामाचा/चैतन्याचा ध्वनी ऐकत राहणे म्हणजेच नामस्मरण होय. हा चैतन्याचा नाद ओळखून त्याच्याशी एकरुप होण्याने अंतर्यामी चैतन्याच्या स्वरुपाचा बोध होऊन अखंड आनंदाचा लाभ होतो. आत्मरुपाशी एकरुपता पावल्याने मायेचा निरास होतो. देहाची आसक्ती रहात नाही. त्यामुळे पराधीन असलेला जीव स्वतंत्रता प्राप्त करुन घेतो.

सोहं रुप हेच आत्मरुप आहे. आत्मा हाच सोहं देव आहे. सोहं हा सिद्धमंत्र आहे. ज्या साधनेने सोहं स्वरुप प्रत्ययाला येते ती सोहं साधना आहे. या विश्वाच्या बुडाशी एक सोऽहं तत्त्व आहे. म्हणजेच सोऽहं हा स्वानंदघन अजन्मा आत्मा आहे. (सोऽहं आत्मा स्वानंदघन । अजन्मा तो तूचि जाण) सोहं हे चैतन्य आहे. सोहं हे सद्गुरुचे खरे स्वरुप आहे. आणि शरीरातील सोहंगति हे सद्गुरुंचे चरण आहेत. सोहं सहस्रधारामध्ये आहे. तेथे सोहंचा नाद व प्रकाश चोवीस तास आहे. विश्वाच्या बुडाशी असलेल्या सोहं तत्त्वाचे ज्ञान सोहंरुपी सद्गुरुंनी कृपा केली असता कळते. सद्गुरु प्रसन्न झाले म्हणजे सोहं आत्म्याचा साक्षात्कार सोहं भाव जागृत झाल्यावर घडतो. नामाचे/नादाचे देहातीत स्मरण म्हणजे चैतन्य आणि चैतन्य म्हणजेच स्मरण होय. सोहं स्मरणाचा तंतू नाभीचे मूळ जे आधारचक्र आहे तेथून सहस्रदलापर्यंत जाऊन तेथे तो स्थिर व निवांत होतो. सोहं स्मरणाच्या तंतूचा झणत्कार होण्यासाठी देहात घुमणाऱ्या चैतन्याच्या नादावर लक्ष ठेवणे जरुरी आहे. (सोऽहं सोऽहं ध्वनि उमटे । तेथे लक्ष लावी नेटे ।) असे केल्याने पंचमहाभूतांनी बनलेल्या स्थूल व सूक्ष्म तत्त्वांचा निरास होतो.

**इ) आत्मसाक्षात्काराची प्रक्रिया :-**

**नाद बिंदू कला ज्याती । पावली उन्मनी सहज स्थिती**
**पवन-विजये निश्चती । साधन योगे ।।४५।।**

**मनीची आशा सांडोन । सतरावी जागृत करोन**
**प्राणपान करोनी समान । धारणा धरोनी स्वरुपाची ।।४६।।**



**नामभक्ती जीव शिव । ऐक्य होता एक भाव**
**सुखसिंधू महानुभाव । जाणता तो ।।४७।।**

**दृश्य द्रष्टा आणि दर्शन । धृति धारणा आणि ध्यान**
**होऊनी विलीन समाधान । आनंदस्वरुपी होतसे ।।४८।।**

**दृष्टीस पावले स्थिरपण । चित्त होतसे चैतन्य**
**जैसे सागरी लवण । विरावे का ।।४९।।**

सद्गुरुंनी आत्मसाक्षात्कारासाठी 'नाम' हे साधन सांगितले. आत्मसाक्षात्कार किंवा आत्मदर्शन हे नाद, बिंदु, कला व ज्योती या रुपाने होते. असे दर्शन होण्यासाठी नामाचा अखंड अभ्यास व्हावा लागतो. अशा अभ्यासाने पवनविजय व्हावा लागतो, पवनसिद्धी प्राप्त व्हावी लागते. नामाचा/नादाचा अभ्यास कसा करावयाचा? पवनविजय म्हणजे काय? तसेच पवनसिद्धी कशी प्राप्त होते हे श्रीदासराममहाराजानी पुढील ओव्यांमधून स्पष्ट केले आहे.

जीवन हे श्वासोच्छवासात आहे. श्वासोच्छवासाच्या उपाधीत सापडलेले जीवन म्हणजेच उपाधिभूत जीवन होय. या जीवनात जड आणि चैतन्य सांधले गेले आहेत. जड आणि चैतन्य याना शरीरात सांधणारा दुवा म्हणजे उपाधिभूत जीवन आहे. या जीवनात म्हणजेच श्वासोच्छवासात चैतन्य आणि जड ही दोन्हीही तत्त्वे असतात. असे हे उपाधिभूत जीवन हे चैतन्याच्या अनुभूतीचे माध्यम आहे. उपाधिभूत जीवनात पृथ्वी, आप, तेज, वायु आणि आकाश ही जड तत्त्वे असतात. त्यांतील पृथ्वी आणि आप तत्त्वे म्हणजे स्थूल देह. सूक्ष्म देह हा तेजोरुप आहे, कारणदेह वायुरुप आहे आणि महाकारण देह हा आकाशरुप आहे. या चार देहांचा निरास झाल्याशिवाय आत्मसाक्षात्कार होत नाही. या चत्वार देहांचा निरास म्हणजे साधनाच्या अभ्यासाने या चार देहांचे उपाधिभूत जीवनापासून वेगळे होणे होय.

साधनाच्या योगाने उपाधिभूत जीवनावर चित्ताची एकाग्रता आणि आणि दृष्टीची तादात्म्यता होणे आवश्यक आहे. श्वासोच्छवासाच्या गतिवर दृष्टी व कान एकवटले असता ही गति हळू हळू संथ होऊ लागते. असे झाले की हृदयात वायूची घर्षणक्रिया आपोआप सुरु होते. हृदयामध्ये वायूची घासणी झाली की ॐकाराचा वन्हि प्रगट होतो. ॐकार वन्हि प्रगट झाला की त्या वन्हिच्या आचेने/उष्णतेने उपाधिभूत जीवनातील पृथ्वी, आप, तेज आणि वायू ही तत्त्वे बाजूला होतात. ॐकार रुप वन्हीने जीवनाची वाफ होऊन शुद्ध आकाशरुप जीवन शिल्लक रहाते. हे शुद्ध झालेले जीवन उर्ध्वगामी होते. उर्ध्वगामी झालेले हे जीवन भ्रूमध्यात येते. या भ्रूमध्यात उर्ध्वमुख झालेली जीवनाची गति ही तेथे येणाऱ्या प्राणगतीशी एकरुप होते. ही प्राणगति जेथे आत्मा असतो त्या सहस्रदलस्थानातून भ्रूमध्यापर्यंत येत असते. प्राणाची ही गति सहस्रदलस्थानातून भ्रूमध्यापर्यंत सातत्याने चालू असते. प्राण, अपान, उदान, व्यान व समान असे पांच प्राण देहात असतात. या पंचप्राणापेक्षा सहस्रहृदळस्थानापासून भ्रूमध्यापर्यंत सातत्याने चालू असलेला प्राण वेगळा आहे. भ्रूमध्यात ऊर्ध्वमुख झालेल्या शुद्ध जीवनाची गति ही तेथे येणाऱ्या प्राणगतीशी एकरुप होते. येथेच मनाचा व प्राणाचा एकलय झाल्याने सर्व उपाधींचा निरास होतो आणि पवनसिद्धी साधते.

पुढे ऊर्ध्वमुख झालेल्या जीवनगतीशी एकरुप झालेली प्राणगती ही ऊर्ध्वमुख होते आणि परत सहस्रदलस्थानाकडे वाहू लागते. ही एकरुप झालेली गती वाटेतील त्रिकूट इत्यादी स्थानातून प्रवास करते. ही गती वाटेवर नाद, बिंदू, कला व ज्योति यांचा अनुभव घेत जीवाला शिवरुप पहावयास लावते. आणि दोघेही परब्रह्मस्वरुप होतात. अशा प्रकारे सहस्रदलस्थानात परमात्म्याचा साक्षात्कार होतो. ऊर्ध्वगामी झालेले जीवन जागृती, स्वप्न, निद्रा आणि तूर्यावस्था पार करुन उन्मनी अवस्थेत येते. उन्मनी अवस्थेतच जीव परब्रह्मस्वरुप होतो. ज्ञान ही नाही व अज्ञानही नाही अशी 'विज्ञान' नावाची अवस्था प्राप्त होते. आत्मसाक्षात्कार किंवा आत्म्याचे



दर्शन याचा अर्थ नाद, बिंदू, कला व ज्योती या चार प्रकारानी येणारा आत्म्याचा अनुभव होय. मूळ नाद आहे. नादातच बिंदू, कला व ज्योती असतात. नादाच्या अभ्यासाने नादाचाच बिंदू होतो व त्या बिंदूचीच पुढे कला व ज्योती होते.

थोडक्यात म्हणजे दृश्याची आशा सुटणे आवश्यक आहे. दृश्य विश्वामध्ये जे शब्द, स्पर्श, रस, रुप व गंध हे पाच विषय आहेत. त्यांच्या भोगाद्वारे सुख मिळत राहील असे जीवाला वाटते. अशा दृश्य विश्वाची आशा सोडून जीव प्राणापान समान करुन म्हणजेच श्वासोच्छवासाची गती संथ/सम करुन चैतन्याशी एकरुपता साधतो. चैतन्याशी तन्मयता म्हणजेच नाम भक्ती होय. त्यामुळे जीव-शिव एक होतात. सतरावी जीवन कला प्रकट होते. फक्त आत्मभाव शिल्लक राहतो. आत्मस्वरुपाचा प्रत्यय येतो आणि परिणाम म्हणून अखंड सुखरुपतेचा महानुभव येतो.

### ह) आत्मसाक्षात्काराचे स्वरुप :-

**स्वयंज्योत होता प्रगट । अंधारे काढली पळवाट**
**तयाचे अस्तित्व लोपते स्पष्ट । तयामाजी ।।६।।**

**सूर्यचंद्र लोपोनी गेले । ज्ञानाज्ञान मावळले**
**सकल स्वप्न दृष्टीसी आले । स्वानुभवे ।।७।।**

**आपआपणा पाहणे । पहाण्याचे पहाणे आटणे**
**स्वरुप सुखाते घोटणे । उरले असे ।।८।।**

**तेथे एक दुमदुमे नाम । चैतन्य निजधाम**
**जेथ निमाले कर्माकर्म । क्रिया आणि प्रक्रिया ।।९।।**

**भास गेलिया नुरे आभास । भासणे न ये प्रत्ययास**
**सत्-चिदानंद सर्वेश । जगव्यापक उरलासे ।।१५।।**

**आप आपणा भोगणे । आप आपणा देखणे**
**आभास प्रत्याभास जाणणे । हाची मोक्ष ।।१८।।**

**बोलणे अबोलणे आटले । सुख दुःख जळोनी गेले**
**पाप पुण्य ते सरले (निमाले)। अंतरीचे ।।५०।।**

**अंतरी बाहेरी निर्मळ । एक गोविंद गोपाळ**
**अबोलपणाचे बोल । ज्ञानराजकृपे बोलिलो ।।५१।।**

**दूर होते ते जवळी आले । जवळी होते ते दूर झाले**
**वेदांततत्त्व उमटले । हृदयामाजी ।।५२।।**

आत्मसाक्षात्काराच्या मार्गावर नाद, बिंदू, कला व ज्योती यांचे अनुभव येतात. चैतन्य म्हणजे ज्योत आहे. तिलाच स्वयंज्योत किंवा आत्मज्योति असेही म्हणतात. चैतन्य म्हणजे आत्मा. साधनेचे तप साधले असता ती स्वयंज्योत/आत्मज्योत प्रगट होते. स्वयंज्योतीच्या प्रकाशात बुद्धीतील अज्ञानरुपी अहंकार नष्ट होतो. एवढेच नव्हे तर त्या प्रकाशात अज्ञानाचे अस्तित्वच नष्ट होते. आपल्या देहात आपण जिवंत आहोत तो पर्यंत आपला श्वासोच्छवास चालू असतो. म्हणजे आपला श्वास हा अखंडपणे गतिरुप आहे. या श्वासाधिष्ठित साधनाने चैतन्याचा साक्षात्कार होतो. आपल्या डाव्या नाकपुडीत इडा नावाची नाडी आहे आणि उजव्या नाकपुडीत पिंगला नावाची नाडी आहे. अशा प्रकारे देहातील श्वासोच्छवासात इडापिंगला अथवा चंद्रसूर्य अशा दोन गति आहेत. सद्गुरुनी दाखवून दिल्याप्रमाणे त्या गतीत दृष्टी व कान एकवटले असता त्यांचा लय होतो. आणि असा लय झाला की ती गति ऊर्ध्वमुख होऊन वाहू लागते. चंद्र व सूर्य यांचा लोप होताच अग्निरुप आत्म्याचा लोट दिसू लागतो. साधकाचा प्रज्ञाचक्षु उघडतो. आता त्याच्या डोळ्यास उपाधिभूत जगत् स्वप्नवन भासू लागते. ज्ञान आणि अज्ञान रहित विज्ञान ही अवस्था प्राप्त होते.

चैतन्य हे द्रष्टा आहे. चैतन्याला पाहण्याची नजर वेगळी आहे. चैतन्यानेच चैतन्याला पहावयाचे/जाणावयाचे आहे. चैतन्याला पहाणे म्हणजे 'स्व-रुप' पहाणे होय. दृश्याकडे पहाणे जेंव्हा संपते तेंव्हाच ऊर्ध्वमुख दिशेने गति वाहू लागते. हीच गति चैतन्याला/आत्म्याला पाहण्यासाठी डोळ्याचे काम करु लागते. ही ऊर्ध्वमुख झालेली गति ज्या ठिकाणी पडते त्या ठिकाणाला डोळा असे म्हणतात. आणि या डोळ्यानेच आत्मस्वरुप/चैतन्यस्वरुप पहाता येते. ही गति चिद्वायु-स्वरुपी आहे. आत्मा हा ही चिद्वायु-स्वरुपी आहे म्हणूनच आप आपणा पहाणे घडते. आणि केवळ स्वरुपसुख उरते. अशा अवस्थेत पंचमहाभूते आणि सत्व, रज आणि तम असे तीन गुण मिळून तयार होणाऱ्या अष्टधा प्रकृतीने बनलेल्या नामरुपात्मक जगाचा आभास संपतो. दृश्य, विश्व आणि स्वप्न यात कांहीच फरक नाही. संसार म्हणजे दीर्घ स्वप्न आहे. आत्मज्ञान झालेल्या माणसाच्या दृष्टीने हे विश्व खोटेच आहे. सर्व जगाला व्यापून उरलेला सच्चिदानंद स्वरुपी ईश्वर सर्वत्र असल्याचा अनुभव शिल्लक राहतो. आत्मा/ईश्वर सच्चिदानंद आहे. सत् म्हणजे अस्तित्व. चित् म्हणजे चैतन्य. अस्तित्व हे चैतन्यात भरले असल्याने, तेथे आनंद आहे. गतीमुळे प्रवाह असतो. प्रवाहाला स्वतंत्र अस्तित्व नसते. अस्तित्व हे प्रवाही झाले की तेच चैतन्य होय. आत्मा हा सच्चिदानंद वायु आहे. तो सर्वव्यापक आहे. तो विश्वातही आहे आणि आपल्या देहातसुद्धा आहे. चैतन्यापासून सर्व दृश्य, सर्व विषय झाले आहेत. ते आपणास व्यवहारात भोगावयास मिळतात. परंतु जेंव्हा जीव-शिवाचे ऐक्य होऊन दोघेही परब्रह्मस्वरुपात मिसळत राहातात तेंव्हा चैतन्यच चैतन्याचा भोग घेते. असे होणे म्हणजे आपणच आपणास भोगणे होय. आपणच आपणा पाहणे होय. उपाधिभूत जीवनातील त्रिपुटीचा लय झाल्याने, उरते ती केवळ सुखरुपता व हाच मोक्ष होय.

जीवभाव गती शिवात्म्यात मिसळत राहणे म्हणजे अबोलाचे बोलणे होय. श्रीज्ञानदेवांच्या कृपाप्रसादामुळेच अबोलपणाचे बोलणे शक्य होते. हाच सहस्रदळीचा अनाहत होय. उन्मनी अवस्थेत हे अबोलपणाचे बोलणे ही संपते तेंव्हा सुखदुःख ही संपते, पापपुण्य नाहिसे होते. ईश्वर जसा सगुण आहे तसाच तो निर्गुण ही आहे. त्यामुळे अंतरी व बाहेरी गोविंद

गोपाळ रुपातील चैतन्याचा सर्वव्यापक अनुभव येतो. अगदी आपल्याजवळ असणारे, आपल्याच शरीरात असणारे चैतन्य हे तसे कळत नाही. परंतु संत सद्‌गुरु कृपेने, मायेमुळे जवळ असणारे व खरे वाटणारे दृश्य दूर झाले व अज्ञान दूर झाल्याने स्वतःपासून दूर भासणारे स्वतःचेच चैतन्यस्वरुप प्रगट झाल्याचा अनुभव येतो. अशा तऱ्हेने मी आत्मस्वरुप/ब्रह्मस्वरुप आहे आणि सर्व जगतही ब्रह्मस्वरुप आहे असे वेदांतातील तत्त्व बुद्‌धीत ठसते.

**ळ) आत्मसाक्षात्काराचा परिणाम :-**

**प्राप्त जाहल्या निर्गुण । मना होय समाधान**
**वासना पावे जेथे ज्वलन । काम क्रोध मग कैचे ।।४।।**

**आपणा आपण पहाता । मोक्ष गवसे अवचित हाता**
**उरली नाही शोक चिंता । औषधासी ।।१७।।**

आत्मसाक्षात्कार झाला असता चित्ताचे चैतन्य होते. मन उन्मन होते. उन्मन अवस्थेत तिन्ही गुणांचा निरास होऊन सर्वत्र अद्वैतभाव प्रकट होतो. अद्वैतभावात अहंकार नसतो. त्यामुळे आपोआपच वासना शमतात. दृश्य विश्वाचा भोग घेण्याची इच्छा उरत नाही. जिथे वासनाच नाही तिथे काम, क्रोध इत्यादी विकार तरी कसे असणार? वासना शांत होताच समाधानाचा अनुभव येऊ लागतो. आत्म्याला पाहता पाहता जीव स्वतःच आत्मरुप बनतो आणि स्वतःलाच पाहू लागतो. त्रिपुटीमुळे उद्‌भवणारा द्वैतभाव संपतो द्वैतरहित मोक्षाची प्राप्ती होते. मोक्षाचे लक्षण म्हणजे सर्व दुःखाची निवृत्ती आणि परमानंदाची प्राप्ति होय. असा मोक्ष हाती आल्यानंतर शोक, चिंता, काळजी औषधालाही उरत नाही. नामरुपात्मक दृश्य पाहणारा मी (अहंकार) ही जीवाची उपाधी नाहीशी झाल्याने दृश्य ही संपते. द्रष्टा आहे म्हणून दृश्य आहे. ध्यान, धारणेत त्रिपुटी असते. ज्ञाता, ज्ञेय, ज्ञान किंवा द्रष्टा, दृश्य व दर्शन अशा प्रकारची त्रिपुटीच रहात नाही. त्यामुळे आनंद व समाधानाचा अनुभव येतो. चंचल दृश्यच नाहिसे झाल्याने दृष्टीला



स्थिरपणा येतो. दृष्टीला चैतन्याखेरीज दुसरे कांही दिसतच नाही. चित्त विषयरुपता टाकून स्वतःच चैतन्यमय होते व सागरात लवण विरावे तसे सर्व कांही चैतन्यमय होऊन जाते.

**क्ष) आत्मज्ञानी/संत/सद्‌गुरुंची प्रार्थना :-**

आपल्यावरती आत्मज्ञानी संत-सज्जनांची कृपा सदैव असावी या इच्छेने श्रीदासराममहाराजांनी त्यांची प्रार्थना केली आहे.

**अ) श्रीशंकराचार्य :-**

**शंकराचार्य जगद्‌गुरु । वंदुनी प्रेमेसी आदरु**
**मागणे मागतो जोडोनी करु । कृपाप्रसाद असावा ।।५८।।**

आद्य शंकराचार्य हे प्राचीन भारतातील एक अलौकिक आणि अद्वितीय विभूति होते. आपल्या अल्प आयुष्यात त्यांनी जे प्रचंड कार्य केले, त्याला तोड नाही. आसेतुहिमाचल भारत भ्रमण करुन, त्यांनी जनजागृती केली. स्वतः संन्यासी असून, त्यांनी निष्काम कर्मयोगाचे आचरण केले. त्यांच्या उपलब्ध ग्रंथांवरुन बोलावयाचे झाल्यास, ते वेदशास्त्रज्ञ, एकनिष्ठ भक्त, योगी, तत्त्वज्ञानी महापुरुष आणि आत्मसाक्षात्कारी संत होते हे कळून येते. शंकराचार्यांच्या नावावर आज अनेक लहान मोठे ग्रंथ दिले जातात. या ग्रंथांमध्ये दहा उपनिषदांवरील भाष्ये, ब्रह्मसूत्रावरील भाष्य, भगवद्‌गीतेवरील भाष्य, अनेक देवदेवतांची स्तोत्रे आणि आत्मानात्मविवेकासारखे अनेक प्रकरण ग्रंथ आहेत.

श्रीदासराममहाराजांचा चिमड संप्रदाय आहे. हा संप्रदाय तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने अद्वैतवादी आहे. म्हणूनच श्रीदासराममहाराजांच्या लेखनात अद्वैत तत्वज्ञानावर भर देण्यात आलेला दिसून येतो. केवलाद्वैताच्या तत्त्वज्ञानाची मांडणी करून या मताचा प्रचार व प्रसार भारतभर करणारे श्रीशंकराचार्यांच्या विषयी श्रीदासराममहाराजांना आदरयुक्त प्रेम आहे. म्हणून ते जगद्‌गुरू शंकराचार्यांना दोन्ही कर जोडून आदरयुक्त प्रेमाने, त्यांचा आपल्यावरती

कृपाप्रसाद असावा अशी प्रार्थना करतात.

**ब) श्रीरेवणसिद्‌ध :–**

**योगिराज श्रीरेवणसिद्‌ध । शक्ती जयांची अगाध**
**जे कां प्रसिद्‌ध अनादी सिद्‌ध । शंभुस्वरुप ।।६१।।**

**तयांची वंदितो चरणधूळी । बोधज्योती प्रगटली**
**तद्रूप होऊनिया ठेली । दर्शेंद्रिये ।।६२।।**

फार प्राचीन काळापासून भारतात भगवान शिवाची उपासना चालू आहे. शिवाच्या उपासकांमध्ये कालांतराने अनेक पंथ आणि उपपंथ प्रचारात आले. त्यामध्ये वीरशैव हा एक पंथ होता. वीरशैवांच्या परंपरेनुसार वीरशैव धर्म हा मूळ पाच आचार्यांनी स्थापन केला. त्यांना पंचमहाआचार्य म्हणतात. त्यानाच अनेकदा पंचमहासिद्‌ध म्हणतात. हे पाच महासिद्‌ध असे : रेवण, मरूळ, एकोराम, पंडित आणि विश्व. 'सन्मार्गदीप' नावाचा ग्रंथ स्कंदपुराणाचा हवाला देऊन सांगतो :– रेवणसिद्‌ध सोमेश्वराच्या पिंडीतून उद्‌भवले. त्यांचे करस्थळी मरुळसिद्‌ध व त्यांचे करस्थळी काडसिद्‌ध अवतरले. या तीनही सिद्‌धात रेवणसिद्‌ध हे श्रेष्ठ आहेत. सांगली जिल्ह्यातील विटे ग्रामाजवळील रेणावी या गावाजवळ असणाऱ्या रेणागिरी डोंगरावर रेवणसिद्‌धांचे स्थान आहे. या स्थानी भक्तजन दर अमावस्येला रेवणसिद्‌धांच्या दर्शनास येतात. महाशिवरात्रीला तर मोठी यात्राच भरते. रेणावी या स्थानी रेवणसिद्‌ध भगवान शंकररुपाने आहेत. कांहीजण त्याना आपले कुलदैवत मानतात. रेणागिरी येथील रेवणासिद्‌धांचे स्थान जागृत आहे. या स्थानाविषयी अनेक कथा सांगितल्या जातात. भक्तासाठी रेवणसिद्‌धानी 'हालसिद्‌ध' या नावाने अवतार घेतला. रेवणसिद्‌ध हालसिद्‌धरुपाने घोसरवाड येथे प्रगट झाले. हालसिद्‌धांची स्थाने घोसरवाड, कारिकोळ, अप्पाची वाडी इत्यादी ठिकाणी आहेत.

सर्व सिद्‌धांचा मूळ उगम भगवान श्रीशंकरापासून आहे. म्हणजेच



सिद्‌धपरंपेचे मूळ शिवशंकर आहे. भगवान सोमेश्वरापासून रेवणसिद्‌ध प्रगट झाले. रेवणसिद्‌धांचे शिष्य मरूळसिद्‌ध आणि रेवणसिद्‌धांचा अवतार काडसिद्‌ध किंवा रेवणसिद्‌धांनाच काही कारणास्तव काडसिद्‌ध हे नांव प्राप्त झाले. या तीन सिद्‌धांना "सिद्‌धत्रयी" म्हटले जाते. श्रीरेवणसिद्‌ध हे चिमड संप्रदायाचे मूळ आहे. योगीराज रेवणसिद्‌ध म्हणजे साक्षात भगवान शंकर असे म्हटले जाते. ते सर्वशक्तिसमन्वित असे आहेत. त्यांनी केलेल्या बोधामुळे आत्मज्योती प्रकाशमान होते. त्यामुळे पाच कर्मेंद्रिये व पाच ज्ञानेंद्रिये अशा दर्शेंद्रियाना तद्रूपता प्राप्त होते. अशा या श्रीरेवणसिद्‌धांच्या चरणधूलीना दासराममहाराज वंदन करतात.

**क) प.पू.श्रीरघुनाथ ऊर्फ बाबूरावजीमहाराज कोटणीस :–**

**धन्य हरिभक्त रघुनाथ गोविंद । भोगिती जे परमानंद**
**अखंड किर्तन साधन छंद । जयालागी ।।५९।।**

**वंदितो तयांचे चरण । जया गुरु आज्ञा प्रमाण**
**जेथे आपणा आपणा । पहाणे जाहले ।।६०।।**

चिमडपंथीय साक्षात्कारी सत्पुरुष प.पू. श्रीतात्यासाहेब कोटणीस महाराज यांचे प.पू.श्रीरघुनाथ कोटणीस हे ज्येष्ठ चिरंजीव होत. ३१ डिसें.१८९९ रोजी यांचा जन्म झाला. त्यांना प.पू. श्रीतात्यासाहेबमहाराजांचा अनुग्रह लाभला होता. त्यांच्या विवाहानंतर कुरुंदवाड गांवी वकिलीची सनद काढून बाबूरावजी तेथे वकिली करू लागले. पुढे मात्र वडिलांच्या इच्छेप्रमाणे ते सांगलीतच राहिले व त्यांनी तात्यासाहेबमहाराजांची उपासना-परंपरा पुढे चालू ठेवली. त्यांची दैनिक उपासना चालूच होती. त्याबरोबर त्यांनी चिमड संप्रदायाशी संबंधित साहित्य तसेंच इतर साधुसंतांची कांही वेचक पद्ये पुस्तक रुपानी प्रकाशित केली.

श्रीबाबूरावजींना आणि त्यांची प्रथम पत्नी सौ. जानकीवहिनी यांना श्रीदासराममहाराजांच्या बद्दल फारच आपुलकी वाटे. दासरामांना ते

आपला मुलगा असेच मानीत. अशा श्रीबाबुरावजींना दासराममहाराज वंदन करतात.

**ड) श्रीमामामहाराज (श्री गोविंद केळकर):-**

भगवद्भक्तीची व गुरुसेवेची परंपरा लाभलेल्या केळकर घराण्यात अखंडनामसंकीर्तनयोगी, अशा श्रीगोविंद अनंत तया बापूराव उर्फ मामा केळकर यांचे पोटी श्रीदासराममहाराजांचा जन्म झाला. प.पू.श्रीमामामहाराजांचा पारमार्थिक अधिकार फार मोठा होता. मात्र आत्यंतिक प्रसिद्धीपराड.मुख वृत्तीमुळे व "ब्रह्माची एक एकले । असे कोंदले परिपूर्ण ।।" अशा अवस्थेत असल्याने ते सदा सर्वदा नम्र होऊन असत. नामनिष्ठ मामांनी नाममात्र प्रपंच करुन आपले आयुष्यच साधनीभूत केले. प.पू.श्रीसद्गुरु तात्यासाहेब कोटणीसमहाराज इ. स.१९२४ साली (पौष कृ.षष्टी) निजधामास गेले. तात्यासाहेब महाराजांनी देह ठेवल्यावर माघ वद्य तृतीयेला रात्री नेमाप्रमाणे मामामहाराज दासबोध वाचीत असताना त्यांच्या पुढे प.पू.श्रीकोटणीसमहाराज साक्षात प्रगट झाले आणि त्यांनी नित्यकीर्तनाचा आदेश दिला आणि तेव्हापासून मामामहाराजांचे नित्यहरिकीर्तन सुरु झाले व ते त्यांनी आपल्या निर्याणापर्यंत अखंड अडतीस वर्षे चालविले. प.पू.श्रीमामामहाराजांनी लिहिलेले १) श्रीहनुमद्गुरुचरित्रबोधसार २) श्रीरामपाठ ३) अमृतवाणी (अभंग गाथा) हे ग्रंथ त्यांच्या साक्षात्कारी जीवनाची साक्ष देतात. श्रीदासराममहाराज प.पू.पिताजी श्रीमामामहाराजांना केवळ पिता नव्हे तर साक्षात परमेश्वर मानीत. अशा आनंदरूप सत्पुरुष असलेल्या श्रीमामांच्या चरणाना ते वंदन करतात.

**इ) प.पू.श्रीतात्यासाहेब कोटणीस महाराज :-**

**कल्पतरु चिंतामणी । परीस कामधेनू जाणी**
**तात्यासाहेबमहाराज संतमणी । मजलागी जाहले ।।५३।।**

**तयांचे कृपे अनुभव आला । परी पाहिजे त्यानीच टिकविला**
**कोड पुरवावे बोबडे बोला । अबोलाच्या ।।५४।।**



**नामस्मरणी यावे मरण । परी न व्हावे दुराचरण**
**गुरुचरण पूजनार्चन । न सुटावे सहसाही ।।५५।।**

**हेची सद्गुरुसी विनंती । वारंवार असे निश्चिती**
**आपुले चरणकमल चित्ती । असो द्यावे ।।५६।।**

**गुरुनाथांचे आज्ञेपरी । अबोल बोलिलो निर्धारी**
**संतवचनामृतावरी । धरोनिया विश्वासा ।।५७।।**

**गुरुचरणाचा प्रताप । काय काळाची आहे ताप**
**येथे कोणाचा चाले कोप । भाईयानो ।।६३।।**

**अद्वैत भक्ती अंतरी बाणता । जाहली जन्माची सार्थकता**
**मग तयासी मागुता । जन्म नाही ।।६४।।**

**जे कां असे अंतर्गत । आत्मबोध प्रत्ययामृत**
**अर्पितसे गुरुचरणाप्रत । सद्गुरुंचा दासराम ।।६५।।**

प.पू.श्री तात्यासाहेबमहाराजांचे संपूर्ण नांव हणमंत पांडुरंग कोटणीस. तेरदाळ गावी ७ नोव्हें.१८६४ रोजी त्यांचा जन्म झाला. प.पू.चिमडमहाराजानी इ.स.१८८६ रोजी श्री.तात्यासाहेबमहाराजांना अनुग्रह दिला. सांगलीत वकिली चालू असतानाच त्यांनी चिमडमहाराजांच्या आज्ञेने नित्याचे हरिकीर्तन सुरु केले. नित्य हरिकीर्तनाद्वारे परमार्थाची महती वाखाणत चिमड संप्रदायाचे नांव महाराष्ट्रात सर्वतोमुखी केले. आणि मुमुक्षूंना मार्गदर्शन केले. त्यांची शिष्यपरंपराही आजतागायत चालू आहे. प.पू.श्री.तात्यासाहेबांच्या भक्तांमध्ये श्री मामामहाराज केळकर आणि श्री. तात्यासाहेबमहाराजांच्या शिष्यांमध्ये श्रीदासराममहाराज (दादामहाराज केळकर) हे दोघे पितापुत्र आपल्या निष्ठेने, साधनाभ्यासाने व श्री.तात्यासाहेबमहाराजांच्या कृपाप्रसादाने सर्वश्रेष्ठ झाले. श्री.तात्यासाहेबांच्या आज्ञेने श्री मामामहाराजांनी अखंड अडतीस वर्षे कीर्तन करून गुरुसेवेचा आदर्श जगापुढे ठेवला.

श्रीदासराममहाराजांचा जन्म ६ ऑगस्ट १९२० या दिवशी कुरुंदवाड ग्रामी झाला. श्रीतात्यासाहेबमहाराजानी "आहेच मुळी हा राम आमचा," असे म्हणून बाळाच्या मस्तकावरुन आपला वरदहरत फिरवून, बाल-रामाला दृष्टिद्वारा कृपानुग्रह दिला. यावेळी बाल-रामाचे वय फक्त १४ दिवसांचे होते. "हा आमचा राम बालपणापासूनच कीर्तन करू लागेल" असा आशिर्वादही दिला. तो पुढे खरा ठरला. श्री. मामामहाराजांचे नंतर त्यांनी अखंड ३९ वर्षे हरिकीर्तन केले.

श्री. दासराममहाराज अशा या आपल्या सद्गुरुंना वारंवार वंदन करतात. ते त्यांना कल्पतरु, चिंतामणी म्हणून संबोधतात. आपल्यावर सद्गुरुंची कृपा सतत असावी, त्यांचे चरणकमल चित्तात सदैव असावेत असे ते वारंवार विनंती करतात. सद्गुरुंच्या कृपेमुळेच अद्वैताचा बोध होतो, कशाचेही भय रहात नाही. जन्माचे सार्थक होऊन जन्ममरणाच्या फेऱ्यातून मुक्तता प्राप्त होते. सद्गुरुंच्या आज्ञेवरुनच हे 'अबोलाचे बोल' बोलण्याचे धाडस आपण केले असल्याचे सांगून, असे हे आत्मज्ञानाचे अनुभवामृत सद्गुरुचरणांपाशी श्रीदासराममहाराजांनी अर्पण केले आहे.

-------